सोलापूर **तरुण भारत**

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, २२ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २६८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले, ३ मार्चपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन

नागपूर, २१ डिसेंबर : नागपूर येथे १६ डिसेंबरपासून सुरू झालेल्या राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचे आज, २१ डिसेंबर रोजी सूप वाजले. पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून मुंबई येथे असणार आहे. या अधिवेशनात विधानसभा अध्यक्ष, विधान परिषद सभापतींची निवड करण्यात आली. तसेच कायदा आणि सुव्यवस्था, कांदा प्रश्नाबरोबरच आमदार नाराजी, सत्ताधारी-विरोधक आमनेसामने असे चित्र पाहायला मिळाले.

विधीमंडळाच्या अधिवेशनात प्रत्यक्षात ४६ घंटे २६ मिनिटे कामकाज झाले. अधिवेशनाला अधिकाअधिक ८७.८० टक्के सदस्यांची उपस्थिती होती, तर अल्प उपस्थिती ४८.३७ टक्के होती. एकूण सरासरी ७२.९० टक्के सदस्यांची उपस्थिती होती. अधिवेशनाच्या कालावधीत १० मिनिटे वाया गेली. प्रतिदिन सरासरी कामकाज ७ घंटे ४४ मिनिटे झाले. प्राप्त झालेल्या ३१६ औचित्याच्या सूत्रांपैकी १७७ वर चर्चा झाली. अधिवेशनात एकूण १३ विधेयके संमत करण्यात आली.

विधिमंडळाचे सन २०२४ चे हिवाळी अधिवेशन

दोन्ही सभागृहात मंजूर विधेयके : १७, संयुक्त समितीकडे प्रलंबित विधेयके : ०१, विधानसभेत प्रलंबित विधेयके : ०१, एकूण : १९

दोन्ही सभागृहात मंजूर विधेयके

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे विधेयक, २०२४ (ग्रामविकास विभाग)

(२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२४ (नगर विकास विभाग) (अप्रत्यक्षपणे निवडलेल्या नगर पंचायतीच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांचा पदावधी पाच वर्षे करणे)

(३) श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) विधेयक, २०२४ (विधि व न्याय विभाग) (विश्वस्त समितीचा कार्यकाळ आणि समिती सदस्यांची संख्या वाढविणे)

(४) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२४ (सामान्य प्रशासन विभाग) (सर्वसाधारण बदलीसाठीच्या कालावधी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढवण्याची तरतूद)

(५) महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ (महसूल व वन विभाग) (जमिनीचे हस्तांतरण किंवा विभाजनाचे नियमाधीकरण करण्यास परवानगी देणे आणि नियमाधीकरण अधिमुल्य कमी करुन बाजारमुल्याच्या ५ टक्के इतके निश्चित करणे)

(६) महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग)

(७) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (वाचन संस्कृतीचा व ग्रंथालय चळवळीचा विकास करण्यासाठी अधिनियमाच्या विवक्षीत कलमांमध्ये सुधारणा करणेबाबत)

(८) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (समुह विद्यापीठ घटित करणेच्या तरतुदीमध्ये सुधारणा)

(९) महाराष्ट्र खाजगी विद्यापीठं (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (तीन नवीन खाजगी विद्यापीठे स्थापन करणेबाबत)

(१०) महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२४ (पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग) (अपराधांच्या शिक्षेत वाढ अधिनियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल कडक शिक्षा व दंड वाढविण्याबाबत)

(११) हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रदद् करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ (महसूल व वन विभाग) (अनधिकृत हस्तांतरण नियमित करणेबाबत)

(१२) महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२४ (वित्त विभाग)

(१३) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२४ (महसूल व वन विभाग)

(१४) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर (सुधारणा व विधीग्राह्यीकरण) विधेयक, २०२४ (वित्त विभाग)

(१५) महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२४ (वित्त विभाग)

(१६) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

(१७) महाराष्ट्र कारागृहे व सुधारसेवा विधेयक, २०२४ (गृह विभाग)

संयुक्त समितीकडे प्रलंबित – (१) महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४ (गृह विभाग)

विधानसभेत प्रलंबित विधेयके – (१) महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४. (महसूल व वन विभाग) (दंडाच्या कमाल मर्यादेत वाढ).

## राज्यात पुढील काही दिवस थंडी कायम राहणार

मुंबई: राज्यात पुढील काही दिवस थंडी कायम राहणार आहे. देशाच्या उत्तरेकडे थंडीची लाट आली असून याचा परिणाम राज्याच्या हवामानावर झाला आहे. तापमानात थोडी वाढ झाली असली तरी थंडीचा कडाका कायम आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात गारठा वाढला आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार देशात वाहणाऱ्या थंड वाऱ्यांची तीव्रता वाढली आहे. त्यामुळे मध्य भारतापर्यंत गारठा वाढला आहे. तर पूर्वोत्तर राज्यांमध्येही किमान तापमानात घट होऊन काही ठिकाणी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार, देशात वाहणाऱ्या थंड वाऱ्यांची तीव्रता वाढली आहे. त्यामुळं हिमाचल प्रदेशात २३ डिसेंबरपर्यंत थंडीची लाट येण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्याचबरोबर पश्चिम राजस्थान, पंजाब आणि जम्मू-काश्मीर या राज्यात २५ डिसेंबरपर्यंत थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात गुरुवारी अहिल्यानगरचे तापमान सर्वात कमी होते. या ठिकाणी ७.५ डिग्री सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. राज्यात परभणी, निफाड, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर येथेही थंडी वाढली आहे. विदर्भासुद्धा थंडीचा कडाका वाढला आहे. बहुतांश जिल्ह्यांमध्ये किमान तापमान १० अंशांच्या खाली गेले आहे.तसेच, पश्चिमी विक्षोभामुळे थंडीची स्थिती वाढू शकते. अनेक भागात थंड वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच पुढील काही दिवस डोंगराळ भागात जोरदार बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे. राज्यात येत्या ४८ तासांमध्ये थंडी वाढण्याची शक्यता आहे. त्यानंतर हळू हळू थंडी कमी होणार आहे.

महाराष्ट्रात कोकण व रत्नागिरीतील तापमानात वाढ झाली आहे. तर राज्यात इतर जिल्ह्यात किमान तापमानात मोठी घट झाली आहे. नैऋत्य व लगतच्या पश्चिम मध्य बंगालच्या उपसागरावर आज कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. तर पुढील १२ तासांत ते उत्तर तामिळनाडू ते आंध्र प्रदेश किनारपट्टी लगत उत्तरेकडे सरकण्याची शक्यता आहे. त्यानंतर २४ तासांत हे चक्रीवादळ आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर उत्तरेकडे सरकण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. त्यामुळे विदर्भात पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## विदर्भ, मराठवाड्यासह राज्याचा विकास साधणार : मुख्यमंत्री

### विदर्भात आंतरराष्ट्रीय दर्जाचे वनपर्यटन, जलपर्यटन, मराठवाड्यातील वॉटरग्रीड प्रकल्प मार्गी लावणार

नागपूर, २१ डिसेंबर : विदर्भ आणि मराठवाड्यासह संपूर्ण राज्याचा समतोल विकास साधून जनतेला न्याय देणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज, शनिवारी विधानसभेत दिली. अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते.

याप्रसंगी फडणवीस म्हणाले की, विदर्भातील सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प येत्या ७ वर्षात मार्गी लावणार आहे. ८८ हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे १० लाख एकर जमिन ओलिताखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे ५५० किलोमीटर लांबीची नवी नदीच तयार होणार असून यामुळे विदर्भात मुबलक पाणी उपलब्ध होणार आहे. नाग नदी सुधाराला मान्यता मिळाली आहे. नाग-पोहरा-पिवळी नदी असा प्रकल्प असून सांडपाणी या नद्यांमध्ये जाऊ नये यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यामुळे औद्योगिक क्षेत्रात देखील वाढ होण्यास मदत होईल. मुबलक पाण्यामुळे विदर्भाच्या औद्योगिक विकासालाही गती मिळेल. तसेच विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी बळीराजा योजनेमुळे सिंचन क्षेत्र वाढणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सिंचन क्षेत्र वाढण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. कन्हान नदी वळण योजनेला मंजूरी दिली असून ३२०० एकर जमिन सिंचनाखाली येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. त्यासोबतच केंद्र आणि राज्य सरकारने मोठी गुंतवणूक केल्याने गोसी खुर्द प्रकल्पाच्या माध्यमातून जलपर्यटनाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. अभोरा येथे जलपर्यटन तर भंडारा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया या ठिकाणी वनपर्यटन सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे गडचिरोली-चंद्रपूर-वर्धा-भंडारा-नागपूर या प्राधान्य क्रमाने खनिकर्म (मायनिंग) प्रकल्प हाती घेतले आहेत. यामध्ये गडचिरोलीत ५० हजार कोटींची औद्योगिक गुंतवणूक झाली असून खनिजावर आधारित प्रकल्पामुळे गडचिरोली स्टील प्रकल्प म्हणून उदयाला येत आहे. चंद्रपूर येथे कोल गॅसिफिकेशन प्लँट करण्याचा निर्णय झाला आहे. या प्रकल्पाचा सामंजस्य करार होऊन केंद्राची मान्यता देखील मिळाली आहे. रामटेक, भंडारा येथील फेरो अलाय क्लस्टर डेव्हलपमेंटमुळे रोजगार निर्मिती होणार आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या सहाय्याने नागपूर मेट्रो प्रकल्प-२ पूर्ण करण्यात येणार आहे. कापूस ते कापड आणि कापड ते फॅशन संकल्पना अमरावतीच्या टेक्सटाईल पार्कमध्ये पूर्ण केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

यासोबतच राज्यातील अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना जवळपास १६ हजार २१९ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. तर धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्यात येत असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. वर्धा, अमरावती, अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यातील ५५ हजार शेतकऱ्यांच्या संत्रा पिकांची गळती झाली होती. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तीन हेक्टर क्षेत्र मर्यादित प्रमाणे जवळपास १६५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## मला जेलमध्ये टाकण्याचे प्रयत्न झाले: एकनाथ शिंदे

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि .२१ डिसेंबर : महायुती सरकारच्या नागपूरमधील हिवाळी अधिवेशनाची शनिवारी अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत बोलताना चौफेर फटकेबाजी केली. बीड, परभणी, नक्षलवादाच्या मुद्द्यांसह विरोधकांनाही लक्ष्य केलं. आपल्या भाषणाची सुरुवात करतानाच त्यांनी शायरीतून ठाकरेंवर निशाणा साधला. 'तुफानों मे कश्तीया और घमंड मे बडी बडी हस्तीया डुब जाती है'. अशी शायरी सादर करत शिंदेंनी भाषणाला सुरुवात केली.

### २.१३लाख रोजगार निर्मित्ती

मागच्या अधिवेशनात श्वेतपत्रिका उद्योग विभागाची काढली होती. आमच्याकडे हिम्मत होती म्हणून निर्णय घेतला. २ लाख १३ हजार रोजगार निर्मिती राज्यात होणार आहे. राज्यात २ लाख ४३ हजार कोटीची गुंतवणूक राज्यात अली आहे. सव्वा लाख लोकांना संधी मिळाली आहे.

### २०२५ पर्यंत नक्षलवाद संपणार

मला नक्षलवाद्यांची धमकी अली होती, मी विकासाचा मुद्दा समोर ठेऊन काम करत आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्लीत बैठक घेतली होती. आपल्या इकडचे नक्षलवादी छत्तीसगढला पळून जायचे आणि जंगलात लपून रहाचे. कारण, काँग्रेस सरकार त्यांना लपायला मदत करत होते. मात्र, आता २०२५ पर्यंत महाराष्ट्रातील सगळा नक्षलवाद संपून जाणार आहे , असेही शिंदेंनी सांगितले.

बीड, परभणीवरुन राज्यात उपस्थित झालेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावरुन भाष्य केले. तसेच, मला महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये तुरुंगात टाकण्याचे प्रयत्न झाले, तर महाराष्ट्रात २०२५ पर्यंत सगळा नक्षलवाद संपणार असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्यात कायदा सुव्यवस्था प्रश्न आहे म्हणतायत. परंतु, त्यांच्याकाळात गृहमंत्री अटकेत होता. साधू हत्याकांड झाले आणि ही मंडळी कायदा सुव्यवस्था विषयावर बोलत आहेत. महाविकास आघाडी काळात पोलीस यंत्रणेचा बेसुमार वापर करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील खोट्या केसमधे अडकविण्याचा प्रयत्न झाला. त्यामधे काही मंत्री देखील यात होते. मला देखील अडकविण्याचा प्रयत्न करण्यात आला, पुरावा देखील आम्ही सादर केला आहे. सत्तेचा दुरुपयोग कसा केला हे आपल्याला यावरून पहायला मिळालं, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी महाविकास आघाडी सरकारमधील घडलेल्या घटनांवर भाष्य करत काही गौप्यस्फोटही केले.

मला जेलमध्ये टाकण्याचे प्रयत्न झाले

बीड परभणी प्रकरणात कुणालाही सोडले जाणार नाही. मी महाविकास आघाडीत होतो, तिथ मला खोट्या गुन्ह्यात अडकवून जेलमधे टाकण्याचा प्लॅन सुरू होता, अंबादास आपल्याला माहिती आहे, किती त्रास झाला ते असा गौप्यस्फोटही एकनाथ शिंदेंनी सभागृहात केला. राज्याचे विधानसभेचे अवर म्हंजे काही गप्पा मारण्याचे ठिकाण नाही. बदलापूर घटनेचा विषय निघाला, त्यावेळी काहींजणांनी रेल्वे ट्रॅकवर जाऊन रेल्वे अडवली. आम्ही आरोपीला फाशी देतो म्हटले. मात्र, पोलिसांनी ज्यावेळी आरोपीचा एन्काऊंटर केला तेव्हा आरोपीच्या बाजूने हे लोक राहिले, असा टोला विरोधकांना लगावला.

औषध खरेदीबाबत आरोप करण्यात आले, दोषींवर आम्ही योग्य कारवाई करू, असेही त्यांनी सांगितले.

## महायुतीचे खातेवाटप सकाळपर्यंत होणार : मुख्यमंत्री

नागपूर, २१ डिसेंबर : नागपुरात हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नव्या सरकारचा शपथविधी झाल्यानंतर आता खातेवाटप कधी होणार ? यासंदर्भात राज्यभर कमालीची उत्सुकता असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात महत्वाची माहिती दिली. राज्य मंत्रिमंडळाचे खातेवाटप आज, शनिवारी रात्री किंवा उद्या, रविवारी सकाळपर्यंत होईल असे फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी झाली. निकालानंतर ५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांनी तर उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनी शपथ घेतली. यानंतर १५ डिसेंबर रोजी नागपुरात राज्य मंत्रीमंडळाचा विस्तार झाला. अखेर खातेवाटपाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष वेधले होते.

राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाची आज, शनिवारी सांगता झाल्यानंतर संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली.यावेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महायुती सरकारचे खातेवाटप लवकरच जाहीर होणार आहे. खातेवाटप आज (२१ डिसेंबर) रात्री किंवा रविवारी सकाळी जाहीर होईल असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.









# सुशासन सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमग गावपापतळीवर विविध योजनांची माहिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ डिसेंबर.**
जिल्ह्यात २४ डिसेंबरपर्यंत सुशासन सप्ताह साजरा करण्यात येत आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध लोकाभिमुख योजना 'प्रशासन गाव की ओर' उपक्रमात तहसील आणि पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामपंचायत पातळीवर पोहचविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने सर्व समाजातील विविध घटकातील नागरिकांच्या अडचणी, तक्रारी विशेष मोहीम, उपक्रमाचे शिबिरे आयोजित करून त्या दूर करण्याचा प्रयत्न होत आहे.
त्याअनुषंगाने सुशासन सप्ताहानिमित्त जिल्ह्यात विविध कार्यालयातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. सुशासन सप्ताहानिमित्त आज सेनगाव तालुक्यातील गणेशपूर येथे हरभरा पिकांची शेतीशाळा, जोडतळा व खानापूर येथे कृषी विभागाच्या विविध योजनाविषयी मार्गदर्शन, वाघजळी येथे कृषी विभागाच्या भाऊसाहेब फुंडकर, महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत फळबाग लागवड, गांडूळ खत, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग, प्रधानमंत्री किसान योजना अशा विविध योजनांची माहिती देण्यात आली. या कार्यक्रमास शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रमाणात प्रतिसाद मिळाला.
यावेळी गणेशपूर येथे कृषी सहायक श्री. हरणे, गावातील सरपंच व इतर नागरिक उपस्थित होते. जोडतळा येथे कृषी पर्यवेक्षक श्री. राठोड, कृषी सहाय्यक बी. यु. इंगोले, विजय पवार, बी. एस. काळे, एस. एम. इंगळे व समस्त शेतकरी उपस्थित होते. खानापूर येथे मंडळ कृषी अधिकारी, सर्व कृषी सहायक तसेच पीएमएफएमई योजनेचे अधिकारी यांनी शेतकरी व महिला बचत गटांना मार्गदर्शन केले. वाघजळी कृषी सहायक उपस्थित होते.
कळमनुरी तहसील कार्यालयात सुशासन सप्ताहानिमित्त पुरवठा विभागामार्फत अपंग, दिव्यांग यांना अंत्योदय योजनेच्या शिधापत्रिका वाटप करण्यात आल्या. तसेच संजय गांधी योजना, इंदिरा गांधी योजना या विभागामार्फत लाभार्थ्यांच्या अर्जाची तपासणी करण्यात आली. तसेच सर्व कर्मचारी यांनी नागरिकांची सनद याचे वाचन केले. कळमनुरी येथील उपविभागीय अधिकारी, प्र.तहसिलदार, नायब तहसीलदार (पुरवठा), नायब तहसीलदार (संगायो) उपस्थित होते.
समाज कल्याण विभागाच्या वतीने समाज कल्याण मुलींचे वस्तीगृह येथे शासकीय योजनांची महिती देण्यात आली. तसेच जटाळवाडी व मसोड, जवळा बाजार येथे शेळ्यांची जंत निर्मूलन मोहिम राबविण्यात आली. यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ.शिवाजी बुचाले, पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. आदित्य पारवेकर, पशुधन विकास अधिकारी डॉ. अंतिका पालिमकर उपस्थित होते.
वसमत तालुक्यातील टाकळगाव ग्रामपंचायत कार्यालयात आज सामाजिक वनीकरण विभागामार्फत वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला व ग्रामस्थांना पर्यावरण संवर्धनाविषयी माहिती देण्यात आली.

# किरण लोंढे आत्महत्या प्रकरणाचा तपासामध्ये दिरंगाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ डिसेंबर**
शहरातील करिअर पॉईंट कोचींग क्लासेसच्या शिक्षकांच्या मानसिक त्रासाला कंटाळून किरण गजानन लोंढे या बारावीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांने रेल्वेखाली उडी मारून दि १३ नोव्हेंबर रोजी आत्महत्या केली परंतु या प्रकरणाचा तपास योग्य दिशेने होत नसल्याची तक्रार किरणच्या वडीलांनी पोलिस अधीक्षक यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.
शहरातील करिअर पॉईंट कोचींग क्लासेसमध्ये किरण गजानन लोंढे हा बारावीच्या शिकवणी वर्गात शिकत होता. या कोचींग क्लासेसचे शिक्षक अनिल वानखेडे, सतीश थोरात, ज्ञानेश्वर गिरी यांचे विविध शिकवणी वर्गातील मुलींशी अनैतिक संबंध असल्याची माहीती किरण याला होती. त्यामुळे सदरील शिक्षक हे किरणचा मानसिक आणि शारीरिक छळ करीत होते. त्यास धमक्या देत होते. त्यामुळे किरणने दि १३ नोव्हेंबर २०२४ रोजी रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या केली होती. याप्रकरणी किरणचे वडील गजानन लोंढे यांनी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. याप्रकरणी गुन्हाही दाखल झाला आहे.
परंतु किरणने आत्महत्येपूर्वी लिहून ठेवलेली चिठ्ठी त्याच्या खिशात सापडली. त्यामध्ये त्याने कोचींग क्लासमधील सदरील शिक्षकांचे काही मुलींशी अनैतिक संबंध असल्याचा उल्लेख केला तसेच त्याला हे माहीत असल्यामुळे त्याला धमकी मिळत असल्याचेही नमुद करण्यात आले होते. हिंगोली शहर पोलिस मिळालेल्या चिठ्ठीच्या मजकुराबाबत कोणताही तपास करीत नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे हा तपास योग्य दिशेने होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला असून या गंभीर गुन्ह्याचा तपास योग्य दिशेने करण्याचे आदेश द्यावेत असे नमुद करण्यात आले आहे.

# लेफ्टनंट महेश टापरेंचा जिल्हाधिकाऱ्यांकडून सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ डिसेंबर**
शहरातील सिताराम नगरीत वास्तव्यास असलेले तथा मूळचे पांगरी गावाचे रहिवाशी कडूजी टापरे (माजी सैनिक) यांचा मुलगा महेश टापरे याने पहिल्याच प्रयत्नात एनडीए आणि आयआयटी परीक्षांमध्ये यश मिळविले आहे. काही दिवसातच महेश हा सैन्य दलातील लेफ्टनंट या पदावर रुजू होणार आहे. त्याच्या या यशामुळे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.
यावेळी महेशचे वडील माजी सैनिक नाईक कडूजी टापरे, मामा आनंद साळवे, जिल्हा सैनिकी कार्यालयातील कॅप्टन मुकाडे, माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सय्यद मीर, जिल्हा उपाध्यक्ष बाबुराव जांबुटकर, सहसचिव पंडीत हाके आदी माजी सैनिक उपस्थित होते.
त्याने सैन्य दलात अधिकारी होण्यासाठी एनडीए परीक्षा देण्याचे ठरविले. केवळ दोन महिन्यात त्याने एनडीएची तयारी केली. उच्च काठिण्य पातळी असलेल्या १० परीक्षांमध्ये एनडीए येत असल्याने त्याला यश मिळवणे एवढे सोपे नव्हते. त्याने कुठलेही क्लास न लावता घरीच अभ्यास करून जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर ही परीक्षा तसेच पाच दिवासाच्या मुलाखतीमध्ये पहिल्याच प्रयत्नात यश मिळविले आहे.महेशकडे आपले करिअर घडविण्यासाठी आय.आय.टी. व एन.डी.ए. अशा दोन सुवर्णसंधी असताना त्याने सैन्य दलात अधिकारी होऊन देशसेवा करण्याचे ठरविले. एनडीए परीक्षेतून अधिकारी होणारा महेश हा हिंगोली जिल्ह्यातील पहिलाच अधिकारी आहे. त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. महेशचे वय अवघे १८ वर्षे असून, त्याचे प्राथमिक शिक्षण केंद्रीय विद्यालय, दिल्ली आणि अहमदाबाद येथे व माध्यमिक शिक्षण विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल येथे पूर्ण झाले आहे. त्याने नुकतीच आदर्श महाविद्यालय येथून मार्च-२०२४ मध्ये १२ वी ची परीक्षा ८५ टक्के घेऊन उत्तीर्ण केली होती. त्यांनी मागील एक वर्षापासून घरीच जेईई, आयआयटी करिता ऑनलाईन क्लास लावले होते आणि भारतातील दुसऱ्या क्रमांकाची काठिण्य पातळी असलेली जेईई मेन्समध्ये व जेईई ॲडव्हॉन्स परीक्षेमध्ये पहिल्याच प्रयत्नात यश मिळविले. त्याला आयआयटी गोवा येथे प्रवेशही मिळाला आहे.



**हिंगोली- शहरातील पोलिस अधीक्षक कार्यालयाजवळ असलेल्या जून्या पोलिस वसाहतीतील घरे जीर्ण झाली होती. या निवासस्थानांचे नव्याने बांधकाम करण्यासाठी पोलिस प्रशासनाने जुनी निवासस्थानी पाडण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे अनेक पोलिस कर्मचाऱ्यांना आता नवीन निवासस्थाने लवकरच मिळणार असल्याचे चित्र दिसत आहे. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### प्रा आशिष इंगळे यांना आयकॉन पुरस्कार जाहीर



हिंगोली- जीवनसाधना फॉउंडेशन व दोडासन बाला लोअर युथ क्लब जम्मू काश्मीर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर राष्ट्रीय प्रेरणादायी आयकॉन पुरस्कार २०२४ या मानांकित पुरस्काराने प्रा. आशिष इंगळे यांना सन्मानीत करण्यात येणार आहे. या अगोदर सुद्धा प्रा. आशिष इंगळे यांना राज्यस्तरीय सामाजिक समता पुरस्कार, मराठवाडारत्न पुरस्कार, आयडियल स्टेट अवॉर्ड या नामांकित पुरस्काराने सन्मानीत करण्यात आलेले आहे. हिंगोली जिल्ह्यातील माळधामणी गावचे रहिवाशी असलेले व शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथे भौतिकशास्त्र विषयाचे प्रा. असलेले आशिष मारोतराव इंगळे यांना शैक्षणिक, सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल यावर्षीचा आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी आयकॉन पुरस्काराने सन्मानीत केले आहे. हा पुरस्कार सोहळा नांदेड येथे २२ डिसेंबर २०२४ ला विविध मान्यवरांच्या उपस्थित पार पडणार आहे. आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी आयकॉन पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध क्षेत्रातुन हिंगोली जिल्यासह राज्यभरातून प्रा. आशिष इंगळे यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

### परदेश शिष्यवृत्तीसाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत

हिंगोली- महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी परदेशात पदव्युत्तर, पदवी व पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता अल्पसंख्याक समाजातील मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, पारशी, ज्यू, शीख या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी राज्य शासनाकडून शिष्यवृत्ती देण्यात येते. त्यासाठी अल्पसंख्याक विभागाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. या योजनेसाठी संकेतस्थळावर ताज्या घडामोडीमध्ये विस्तृत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. अल्पसंख्याक प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेसाठी दि. ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत आयुक्त, समाज कल्याण, ३ चर्च पथ रोड, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ येथे अर्ज करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण, हिंगोली यांनी केले आहे.

### ३१ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच अवैध वाहतुक करणाऱ्या ३१ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी शुक्रवार दि २० डिसेंबर रोजी कार्यवाही करीत त्यांच्याकडून २२ हजार रूपयांचा दंड वसूल केला आहे. तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत पोलिसांनी जिल्ह्यात ४ ठिकाणी छापे मारीत अवैध दारू विक्री करणाऱ्यांकडून ८ हजार ३३५ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# माणुसकीची भिंत उपक्रमाचे उद्‌घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ डिसेंबर**
योग विद्या धाम हिंगोली यांच्यावतीने माणूसकीची भिंतीचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर आणि माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्याहस्ते करण्यात आले.मागील ७ वर्षापासून गोरगरीब आणि गरजू लोकांसाठी कपडे आणि इतर वस्तू यासाठी योग विद्याधामच्यावतीने आयोजन करण्यात येत आहे. यावर्षीही दि २१ आणि २२ डिसेंबर रोजी येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्यासमोर हा उपक्रम सुरू राहणार आहे. यावेळी स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, सुभाष तापडिया, मनमोहन सोनी, प्रशांत सोनी, हनुमान केडिया, डि. मुसळे, दत्तराव गीते, दिनेश होकर्णे, आशिष रणशिंगे, कुणाल कांबळे, चेतन भुजवने,रवी जोंधळे,आकाश गायकवाड, राजू आठवले यांच्यासह इतरांची उपस्थिती होती. यावेळी अनेक गरजू लोकांनी माणूसकीची भिंत याठिकाणाहून गरज असलेले जुने आणि नवे कपडे घेवून जात आहेत.

# रामदास पाटील सुमठाणकर पुन्हा जनतेच्या सेवेसाठी मैदानात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ डिसेंबर**
हिंगोली विधानसभा मतदारसंघात भाजपमधून बंडखोरीकरीतनिवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून लढलेले रामदास पाटील सुमठाणकर यांनी दि २० डिसेंबर रोजी येथील त्यांच्या कार्यालयात कार्यकर्त्यांची बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शन केले यावेळी त्यांनी विधानसभा निवडणुकीत जनतेने दिलेला कौल मान्य असून ही आमची रिहर्सल होती असे सांगितले.
हिंगोली विधानसभेत भाजपकडून इच्छुक असलेले रामदास पाटील सुमठाणकर यांना भाजपने उमेदवारी नाकारल्यानंतर त्यांनी हिंगोली विधानसभा अपक्ष उमदेवार म्हणून लढवली. या काळात त्यांच्यावर विरोधकांनी व्यंगत्वावर, त्यांच्या नोकरीवर व कार्यपध्दतीवर टीका केली परंतु रामदास पाटील यांनी कोण्याही पक्षावर टिका केली नाही. केवळ कामाच्या माध्यमातून जनतेला मतदान मागितले. विधानसभा निवडणुकीच्या पराभवानंतर दि २० डिसेंबर रोजी त्यांनी बैठक धेतली. यावेळी त्यांनी भाजपने माझ्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही हे आवर्जुन सांगितल्यामुळे त्यांची पुन्हा भाजपमध्ये येण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. शासनाच्या योजनातळागाळापर्यंत पोहचविणार असल्याचे यावेळी रामदास पाटील यांनी सांगितले. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ डिसेंबर**
जिल्ह्यात२४ डिसेंबरपर्यंत सुशासन सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहानिमित्त येथील जिल्हा ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन आज जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.
या ग्रंथप्रदर्शनात विशेषत: नवीन पिढीला व जनतेला ग्रंथाच्या माध्यमातून वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी विविध ग्रंथाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आलेले होते.
यावेळी उपशिक्षणाधिकारी नितीन नेटके, जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक, सहायक माहिती अधिकारी चंद्रकांत कारभारी, मिलिंद सोनकांबळे, शंभूनाथ दुभळकर, दिंगबर झुंजारे, फारुक शेख व विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती.
तसेच सुशासन सप्ताहानिमित्त विशेष वाचक सभासद नोंदणी मोहीम सुरु करण्यात येत आहे. हिंगोली जिल्ह्यातील सर्व ग्रंथप्रेमी, वाचकांनी मोठ्या प्रमाणात सभासद होऊन सहभाग नोंदवावा व वाचनाचा आनंद घ्यावा. यासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नेहरु नगर, रिसाला नाका, (सपंर्क क्र. ९४०३०६७२६७) येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. हे ग्रंथ प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक यांनी केले आहे.

# कृतीतून शिका या उपक्रमांतर्गत एबीएम इंग्लीश हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची भाजी मंडीला भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ डिसेंबर**
शहरातील ए बी एम इंग्लिश हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची भाजी मंडी येथे भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्यासाठी व प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी विद्यार्थ्यांना भाजी मंडी येथे नेण्यात आले.
विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार भाज्यांची खरेदी करण्यास सांगण्यात आली. यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने व विद्यार्थ्यांची निर्णय क्षमता वाढवून त्यांची निवड पद्धत सक्षम करण्याच्या उद्दिष्टाने हा उपक्रम राबवण्यात आला. एबीएम इंग्लिश हायस्कूल असे उपक्रम नेहमीच राबवत असते जेणेकरून विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात सर्वांगीण विकास घडवून विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात मागे राहणार नाही याबाबतीत शाळा सदैव प्रयत्न करते यातूनच शाळा आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या भेटीचे आयोजन करते व प्रत्यक्ष भेटून विद्यार्थ्यांना अत्यंत चांगले असे अनुभव मिळतात व त्यातून विद्यार्थी शिकतात या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर यांचे नेहमीच सहकार्य लागते तसेच शाळेचे मुख्याध्यापक जोसेफ के जे, सर्व शिक्षक वृंद असे उपक्रम राबवण्यास नेहमीच उत्साही असतो यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून येतो. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिका या पद्धतीचाही अनुभव येतो आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर त्यांनी खरेदी करण्याचे समाधान दिसून येते अशा कार्यक्रमाचे आयोजन केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास ओसंडून वाहतो व विद्यार्थी अत्यंत सकारात्मक पद्धतीने तयार होतो म्हणून शाळा असे कार्यक्रम नेहमीच आयोजित करते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ग्रामसेवकांनी नाकारले अँग्रीस्टैंकचे कामे ! प्रलंबित कामे करण्यासाठी मिळावा वेळ निवेदनाद्वारे केली मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२० डिसेंबर - तालुक्यातील ग्रामसेवकांनी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत कामे केल्याने ग्रामपंचायत स्तरावरील कामे प्रलंबित असून ती कामे करण्यासाठी वेळ मिळावा यामागणीचे निवेदन ग्रामसेवक संघटनेने उपविभागीय अधिकारी यांना नायब तहसिलदार दिनेश राजपूत यांच्या मार्फत दिले आहे



या निवेदनात म्हटले आहे की,सन २०२४-२५ चे आर्थिक वर्ष सुरु झाले पासून लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. निवडणूक काळात आचारसंहिता कालावधी मोठा होता, त्यामुळे ग्रामपंचायतीच्या स्तरावरील वैयक्तिक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी करणे, ग्रामपंचायतीस केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त निधी खर्च करणे. केंद्र व राज्य शासनाचे ध्वजांकित महत्त्वकांक्षी प्रकल्प अंमलबजावणी महत्त्वाची असल्याने ते उद्दिष्ट पूर्ण करणे, प्रधानमंत्री आवास टप्पा-२ चे सर्वेक्षण करणे, कर वसुली इत्यादी महत्त्वाची कामे प्रलंबित आहेत. सदरची संपूर्ण कामे मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाची असल्याने संदर्भीय शासन निर्णयानुसार अॅग्रीस्टैंक प्रकल्प अंमलबजावणीस वेळ देता येणार नाही. त्यामुळे सदरचे काम आम्ही नम्रपणे नाकारत आहोत. असे निवेदनात म्हटले आहे या निवेदनावर महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियनचे अध्यक्ष योगेश धाटबळे,उपाध्यक्ष चांगदेव पवार,उपाध्यक्षा एस.बी.बनगे,सह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत

## शिवसेना नेते,माजी मंत्री आ. अब्दुल सत्तार यांच्या उपस्थितीत सर्वपक्षीय भव्य अभिष्टचिंतन सोहळा पूर्व तयारी बैठक संपन्न

संभाजीनगर ( प्रतिनिधी ) दि.२१,शिवसेना नेते,माजी मंत्री आ. अब्दुल सत्तार यांचा छत्रपती संभाजीनगर येथे सर्वपक्षीय भव्य अभिष्टचिंतन सोहळा येत्या १ जानेवारी रोजी संपन्न होणार आहे. लोकनेते आमदार अब्दुल सत्तार जिल्हा मित्र मंडळाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



या सोहळ्याची रूपरेषा ठरविण्याबाबत शहरातील मराठा लॉन्स येथे छत्रपती संभाजीनगर शहर व जिल्ह्यातील सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पूर्व तयारी बैठक पार पडली. मंत्री असतांना तर अनेकांचे वाढदिवस सोहळा साजरा होतो. मात्र मंत्री पद नसतांना मराठवाड्याची राजधानी छत्रपती संभाजी नगर येथे आमदार अब्दुल सत्तार यांचा ऐतिहासिक अभिष्टचिंतन सोहळा साजरा करण्याचा संकल्प या बैठकीत सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्त्यांनी केला.

आमदार अब्दुल सत्तार यांच्याप्रती चाहते, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये असलेला उत्साह पाहता आणि जिल्हा मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येणारे भव्य नियोजन लक्षात घेता हा अविस्मरणीय काहणकंब साक्षीदार होण्यासाठी आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यास शहर व जिल्ह्यातील सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन लोकनेते आ. अब्दुल सत्तार जिल्हा मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

लोकनेते आ. अब्दुल सत्तार यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास हजारोंच्या संख्येने चाहते येतील या पद्धतीने प्रभावी नियोजन करने तसेच प्रत्येकाने आपापली जबाबदारी स्वीकारून हा ऐतिहासिक सोहळा यशस्वी करण्यासाठी तनमनधनाने काम करण्याचे मनोगत मान्यवरांनी व्यक्त केले.

लोकनेते आमदार अब्दुल सत्तार यांची लोकप्रियता पाहता संभाजीनगर जिल्ह्यासह मराठवाडा व काही अंशी राज्यातील जवळपास १ लाख लोक त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास उपस्थित राहतील असा अंदाज अनेकांनी व्यक्त केला त्या पद्धतीने नियोजन करण्यात येत असल्याचे मित्र मंडळाच्या वतीने सांगण्यात आले.

आ.अब्दुल सत्तार यांच्यावर अन्याय झाल्याची सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांची भावना ; अब्दुल सत्तार यांना मंत्रिपद न मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर

दरम्यान बैठकीत मनोगत व्यक्त करणारे डॉ. दिनेश परदेशी, राजेंद्र राठोड, किरण डोंणगावकर, विनोद तांबे, किशोर बलांडे, अविनाश गलांडे, केतन काजे, विजय चव्हाण, रामहरी जाधव, डॉ. पवन डोंगरे यांच्यासह अनेक सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी आ. अब्दुल सत्तार यांच्या राजकीय कारकीर्द सांगत असतांना अब्दुल सत्तार यांचे राजकारण सर्वसमावेशक असून व्यासपीठावरील सर्वच नेत्यांना अडचणीच्या काळात मदत केली. आयुष्यात त्यांनी कधी कुणाची जातपात धर्म पंथ तसेंच पक्ष न पाहता सर्वांशी जिव्हाळ्याचे आणि मैत्रीपूर्ण संबध कायम ठेवले. अनेकांना जिल्हा परिषद, पंचायत समित्या, मनपा, नगर परिषदा, जिल्हा बँक, दुध संघ, पणन महासंघ, मार्केट कमेंटी यासारख्या विविध संस्थांवर कार्यकर्त्यांची वर्णी लावली व यासाठी वेळप्रसंगी पक्षीय वरिष्ठ नेत्यांचा रोष ओढवून घेतल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या. असे असतांना देखील अशा लोकनेत्याला मंत्री पदापासून वंचित ठेवल्याने उपस्थित सर्वांनीच नाराजगी व्यक्त केली.

दरम्यान अभिष्टचिंतन सोहळ्याच्या पूर्व बैठकीत मंत्री पद न मिळाल्याने सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांना अब्दुल सत्तार कसे उत्तर देतात याकडे राज्याचे लक्ष लागले आहेत. अब्दुल सत्तार रोखठोक मत व्यक्त करण्यात मागेपुढे पाहत नाही त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ते यावर नक्की बोलतील असे बोलल्या जात आहे.

कार्यक्रमाचे प्रस्तावित माजी जी. प. सभापती किशोर बलांडे यांनी केले. सूत्रसंचालन मारुती पा. वराडे यांनी तर शेवटी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या बैठकीस वैजापूरचे माजी नगराध्यक्ष बाळूशेठ संचेती, डॉ. दिनेश परदेशी, हाजी शेख अकील, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब ठोंबरे, कॉंग्रेसचे पदाधिकारी विलास औताडे , विनोद तांबे, डॉ.पवन डोंगरे, बाबासाहेब तायडे ,जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष किरण पा. डोणगावकर , शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र राठोड , खुलताबादचे माजी सभापती जगन्नाथ खोसरे, युवक कॉंगेसचे जिल्हाध्यक्ष वरून पाथ्रीकर, कन्नडचे माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, माजी उपनगराध्यक्ष जावेद शेख, वैजापूर माजी नगराध्यक्ष राजुसिंग राजपूत, गंगापूर माजी नगराध्यक्ष संजय जाधव, शिवसेना कन्नड तालुकाप्रमुख केतन काजे, डॉ. दिलावर बेग, माजी जी. प. अध्यक्ष श्रीराम महाजन, माजी सभापती अविनाश गलांडे, मनाजी मिसाळ, विजय चव्हाण, महेश उबाळे, युवासेना सचिव निलेश शिंदे, जिल्हा दूध संघाचे गोकुलसिंग राजपूत, श्रीरंग पा. साळवे, जिल्हा बँकेचे संचालक रामहरी बापू जाधव, जावेद पटेल, डॉ. मनोज राठोड, पपिंद्रसिंग वायटी, नगरसेविका फिरदोस रमजानी शेख,कृउबा सभापती केशवराव तायडे, उपसभापती दारासिंग चव्हाण, देविदास लोखंडे, नंदकिशोर सहारे, प्रभाकर पारधे, नरेंद्र बापू पाटील आदिंसह जिल्ह्यातील सर्वपक्षीय पदाधिकारी - कार्यकर्ते उपस्थित होते.

## विधानसभा निवडणुकीत कन्नड पंचायत समितीने केली उत्कृष्ट कामगिरी

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२० डिसेंबर - नुकतीच १०५ कन्नड सोयगाव विधानसभेची निवडणूक पार पडली या निवडणुकीत कन्नड पंचायत समितीच्या अधिकारी, कर्मचारी यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे



जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पंचायत समिती कन्नड गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकने यांना प्रशस्तीपत्रक देत उत्कृष्ट कामगिरी बद्दल गौरव केला आहे,

जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशस्तीपत्रक देताच दि.२० रोजी महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन तर्फे गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकने यांचा सन्मान केला यावेळी सन्मानाला उत्तर देताना गटविकास अधिकारी म्हणाले की,हा सन्मान माझा एकट्याचा नसून पंचायत समितमध्ये असलेल्या प्रत्येकाचा हा सन्मान आहे, आपण सर्वांनी मिळून विधानसभेत जी उत्कृष्ट कामगिरी बजवली आहे त्याचे हे फलित आहे असे ते म्हणाले यावेळी महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनिवनचे अध् अध्यक्ष योगेश धाटबळे, पतसंस्थेचे संचालक अशोक काळे, अरुण चव्हाण, सुनील भोजने, कपुर मेहेर, माणिक आबा पगारे, सुधाकर घुले, राजेंद्र पगारे, पोपट जंजाळ, आर.जे.फुलेकर, रामकृष्ण निकम, किशोर जाधव, सुनील अकोलकर, एस.बी.बणगे, आदींची उपस्थिती होती

## स्वालंबन, संस्कार, स्वच्छता यशाची त्रिसूत्री अंगीकारावी-तहसीलदार विद्याचरण कडवकर

### कॉफी मुक्त ज्ञान, यश जीवन सार्थकी करते

कन्नड :- दि.२१ डिसेंबर - विद्यार्थी दशेमध्ये स्वालंबन, संस्कार, स्वच्छता ,चारित्र ,कष्ट, प्रामाणिकपणा या बाबी अंगीकारून कॉपीमुक्त ज्ञान मिळविल्यास जीवन सार्थकी होऊ शकते., स्वतःची कामे स्वतः करा स्वालंबित जीवन जगा २१ व्या शतकात विद्यार्थ्याला या बाबीची अत्यंत गरज आहे. थोडेफार अपयश पदरी आल्यास आत्महत्या करू नका जीवन जगण्यासाठी आहे मरण्यासाठी नाही. असे प्रतिपादन तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी पिशोर शफेपूर येथील माळी समाज मंगल कार्यालयात केले.



करिअर मार्गदर्शन शिबिरात तहसिलदार कडवकर बोलत होते.

पुणे येथील मराठवाडा युवा मंचच्या वतीने आयोजित भव्य आव्हानांना टाळू नका कवटाळा. संधी अनेक आहेत त्यासाठी प्रयत्न करा. यश मिळेपर्यंत ज्याची ज्याची मदत घेता येईल त्याची त्याची घ्या, जे जे करता येईल ते ते चांगले करा. जी माणसे यशस्वी होतात ती स्वतःच्या कुटुंबासाठी जीवन जगतात, परंतु मराठवाडा युवा मंचच्या पदाधिकाऱ्यांनी तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. ही बाब दाखल घेण्यासारखी असेही तहसीलदार कडवकर म्हणाले.

मार्गदर्शन शिबिरासाठी समता कन्या विद्यालय पिशोर, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय पिशोर, अंजना सागर विद्यालय रामनगर, जिजामाता विद्यालय पिंपरखेडा, घासीबाबा विद्यालय जवखेडा, जिल्हा परिषद प्रशाला नाचनवेल, नागेश्वर विद्यालय नागापूर, ए.आय क्लासेस पिशोर, जिल्हा परिषद प्रशाला नादरपुर , जिल्हा परिषद प्रशाला वासडी आधी शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.यावेळी डॉक्टर संजय गायकवाड, प्रा. बिरादार, उद्योजक राम चिंचोले, श्री वैभव आदींनी मनोगत व्यक्त केले, प्रास्ताविक सत्यजित चौधरी , संचलन सतीश गटकळ व रायभान जाधव यांनी केले. तर आभार आर. व्ही.डहाके यांनी मानले.

अकरा हजार रुपयांचा धनादेश

स्पर्धा परीक्षेतून यश संपादन केलेल्या संजीवनी संतोष निकम नादरपुर ग्रामपंचायतच्या वतीने प्रोत्साहन पर अकरा हजार रुपयांचा रोख धनादेश तहसीलदार कडवकरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

## भारत पुन्हा एकदा विश्वगुरू बनू शकेल : शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक

### एमजीएममध्ये 'दि पॉवर ऑफ आयडीयाज' विषयावर व्याख्यान संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ : शिक्षणाला वर्गापर्यंत मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जगण्याचे शिक्षण दिले पाहिजे. हेड, हॅन्ड्स आणि हार्ट या 'तीन एच' ची आपल्याला गरज आहे. यामध्ये कौशल्य असणारे हात, योग्य डोकं आणि करुणामयी हृदय घडविणारे शिक्षण आपल्या विद्यार्थ्यांना मिळाले तर आपले विद्यार्थी जगाच्या कल्याणाचा विचार करीत यशस्वी जीवन जगतील. आपल्या देशाची परंपरा ही याच शिक्षणाची होती. ही परंपरा ही '३ आर' (रिडींग, रायटिंग, अरीथमेटिक) नसून '३ एच' ची (हेड, हॅन्ड्स आणि हा) आहे. शिक्षणाला आपल्या भारतीय परंपरेनुसार पुन्हा एकदा सर्वांनी सुरू करणे आवश्यक असून याच माध्यमातून भारत पुन्हा एकदा विश्वगुरू बनू शकेल. असा विश्वास शिक्षणतज्ञ तथा पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांनी येथे व्यक्त केला.



महात्मा गांधी मिशनच्या ४२ व्या वर्षापण दिनानिमित्त शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर रोजी रुक्मिणी सभागृहात 'दि पॉवर ऑफ आयडीयाज' या विषयावर शिक्षणतज्ञ तथा पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, श्री. वांगचूक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी, महात्मा गांधी मिशनचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, विश्वस्त डॉ.सुधीर कदम, डॉ.नितीन कदम, डॉ.अमरदीप कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शशांक दळवी, तेस्तान दोरजी, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक म्हणाले, शिक्षणाच्या नावाखाली शाळांमध्ये आणि महाविद्यालयात केवळ पुस्तकी ज्ञान दिले जाते. आज पाश्चिमात्य देशांकडून जे काही आपण शिकत आहोत आणि त्यांची नक्कल करून जे शिकत आहोत ते खरे शिक्षण नाही. इंग्लंडकडून आधुनिक शिक्षणप्रणाली आपण घेत आपल्या शिक्षणाला वेगळे रूप दिलेले आहे. त्यांच्या शिक्षणाची समज केवळ '३ आर' (रिडींग, रायटिंग, अरीथमेटिक) पर्यंत मर्यादित होती. ते म्हणत थोडेसे वाचायला शिका, थोडेसे लिहायला शिका आणि थोडी आकडेमोड आली की झाले शिक्षण! ही अत्यंत संकुचित शिक्षणाची व्याख्या पाश्चिमात्य लोकांनी केली होती. मात्र, त्यांच्याच भाषेत रायटिंग डब्लू आणि अरीथमेटिक ए पासून सुरू होते. यातून त्यांची बुद्धिमत्ता आणि शिक्षणाची त्यांनी दिलेली '३ आर' ची व्याख्या आपल्याला समजते. या शिक्षणातून आपण माणसाला संपूर्ण शिक्षित कसे म्हणू शकू?

आजच्या शिक्षणात काहीतरी कमी आहे. आजचे शिक्षण वर्गामध्ये, विचारांत, कागदावर, परीक्षा, कागदी पदवीसह सगळं काही कागदांवर सुरू आहे. मात्र, आपण आपले संपूर्ण जीवन या कागदांच्या बाहेर जगत असतोत. आज मला महात्मा गांधी मिशन या संस्थेत येऊन मनापासून आनंद झाला की, आपण या कागदांच्या दुनियेतून बाहेर येत काही चांगले करीत आहात. आपल्या या संस्थेत हॉटेल मॅनेजमेंटचे विद्यार्थी आपल्याकडे असणाऱ्या सॉल्ट हॉटेल मध्ये शिक्षण शिकतात हे पाहून मनस्वी आनंद झाला. असेच काम मी पण लडाखमध्ये करीत आहे. पत्रकारिता, अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षण यामध्येही एमजीएम खूप चांगले काम करीत आहे. येथील काम पाहून मी प्रभावित झालेलो असल्याचे शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ यांनी केले. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी दाशरथे यांनी केले तर आभार एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शशांक दळवी यांनी मानले.

## बाल आरोग्य तपासणी शिबिरात ३२० बालकाची तपासणी व मोफत औषधी वाटप



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२१ डिसेंबर

कुपोषण मुक्त अभियान अंतर्गत प्रकल्प कार्यालय व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने आमचे घोसला,सोयगाव,वरखेडी,निंभोरा,हनुमंतखेडा व निंबायती हनुमंतखेडा या गावातील अंगणवाडीतील ३२० बालकांचे आरोग्य तपासणी करून त्यांना संजय शहापूरकर यांच्या हस्ते मोफत औषधी वाटप करण्यात आले.

या शिबिराच्या समारोपप्रसंगी आयोजक संजय शहापूरकर यांनी सांगितले की लोक सहभागातून सुरू असलेल्या उपक्रमाचे २० वर्ष पूर्ण झाली असून हा उपक्रम पुढेही सुरू राहणार आहे.यासाठी अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांचे सहकार्य राहणार आहे.नवीन वर्षात सोयगाव येथे कायमस्वरूपी बाल आरोग्य तपासणी कक्ष स्थापन केला जाणार असून त्यात बालरोग तज्ञ मार्फत कुपोषित मुलांचे आरोग्य तपासणी होणार आहे.तसेच तालुक्यातील प्रत्येक उपकेंद्रावर आता अंगणवाडी बालकांच्या आरोग्य तपासणी होणार असून त्यांना मोफत औषधी वाटप करण्यात येणार आहे.

या उपक्रमाला प्रकल्प कार्यालय तालुका आरोग्य कार्यालय वैद्यकीय अधिकारी,आरोग्य समुदाय वैद्यकीय अधिकारी, अंगणवाडी सेविका,मदतनीस,आशा सेविका,आरोग्य सेवक, आरोग्य सेविका तसेच ग्रामपंचायत यांचे सहकार्य लाभत असल्याचे संजय शहापूरकर यांनी सांगितले.

## हायकोर्टाने आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष मानकापे आणि मुख्य व्यवस्थापक देविदास अधाने यांचा जामीन अर्ज फेटाळला

### आरोपीना जामीन मिळाल्यास Forensic Audit आणि MPID कायद्याच्या कार्यवाहीत हस्तक्षेप होण्याची संभावना

औरंगाबाद : आदर्श नागरी सहकारी संस्थेचे अध्यक्ष अंबादास मानकापे आणि माजी मुख्य व्यवस्थापक देविदास सखाराम अधाने यांचा ऋखठ क्र. ४५४/२०२३ आणि ४५५/२०२३ मध्ये, आर्थिक फसवणूक रु. ९१.९७ कोटीच्या संशयास्पद कर्ज व्यवहार प्रकरणात जामीन अर्ज फेटाळत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या प्रकरणात विशेष सरकारी वकील अॅड. कु.कोमल कंधारकर यांनी तर देविदास सखाराम अधाने यांच्यासाठी अॅड. ए.के.भोसले आणि अंबादास मानकापे यांच्यासाठी अॅड. व्ही.बी. गरुड यांनी युक्तिवाद केला.

या घोटाळ्यामुळे हजारो ठेवीदारांची दुरवस्था झाली आहे, त्यापैकी बरेचसे रोजंदारी कामगार आणि औरंगाबाद जिल्ह्यातील विविध भागातील गरीब व्यक्ती आहेत. कष्टाने कमावलेला पैसा रातोरात पळवून पतसंस्था बंद करण्यात आली, बहुतेक गुंतवणूकदारांना असहाय्य आणि दुःखाच्या स्थितीत सोडण्यात आले.

पीडितांसाठी न्यायालयाची चिंता

न्यायमूर्ती एस.जी. चपळगावकर यांनी निकाल देताना असे निरीक्षण नोंदवले की, आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या फसवणुकीमुळे आर्थिक सुरक्षिततेच्या आशेने आयुष्याची बचत करणार्या ठेवीदारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. उच्च न्यायालयाने लहान ठेवीदारांचे होणारे व्यापक नुकसान अधोरेखित केले आणि यावर जोर दिला की सद्यस्थितीत आरोपींची सुटका केल्याने चालू फॉरेन्सिक ऑडिट आणि चझखऊ कायद्याच्या कार्यवाहीला धोका निर्माण होऊ शकतो.

आदेशात न्यायमूर्ती चपळगावकर यांनी टिपणी केली की, हा परिसर दुष्काळी असुन ठेवीदारांमध्ये शेतकरी आणि छोटे व्यावसायिक यांचा समावेश आहे ते त्यांच्या कष्टाने कमावलेले पैसे परत मिळण्याची वाट पाहत आहेत. अध्यक्ष आणि मुख्य व्यवस्थापक हे मुख्य आरोपी आहेत, ठेवीदारांच्या आर्थिक नुकसानाची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांचीच आहे.

माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांची भूमिका

माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी गुंतवणुकदारांची दुर्दशा विविध स्तरावर मांडण्यात आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अथकपणे लढा देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. जलील यांनी १२ डिसेंबर २०२४ रोजी नोटीसव्दारे, जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना प्रतिज्ञापत्र दाखल करून एमपीआयडी कायद्यांतर्गत त्वरीत कारवाई करण्याचे सूचित केले होते, जेणेकरुन अधिसूचनेतील मालमत्तांच्या लिक्विडेशनची प्रक्रिया सुरू होईल. ज्यामुळे गरीब ठेवीदारांना लवकरात लवकर पैसे मिळण्यास मदत होईल.

जलील यांनी नोटीसमध्ये असे निदर्शनास आणून दिले की, कायद्याच्या कलम ५(३) नुसार नियुक्त केलेले सक्षम अधिकारी हे माननीय उच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्देशांनंतरही, एमपीआयडी कायद्यांतर्गत अनिवार्य प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात अयशस्वी ठरले आहे.

जलील यांच्या हस्तक्षेपाने केवळ कायदेशीर कार्यवाहीला गती मिळाली नाही तर ठेवीदारांना अत्यंत त्रासदायक अशा विलंबासाठी अधिकार्यांना जबाबदार धरण्यात आले. तसेच हलगर्जीपणा आणि कामचुकार पणासाठी जबाबदार संबंधित अधिकार्यांची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याची मागणी केली आहे आणि निष्काळजीपणा करणार्यांवर एफआयआर नोंदवण्याची मागणी जलील यांनी केली आहे.

सक्षम अधिकार्याचे प्रयत्न...

जलील यांनी सूचित केलेल्या मुद्द्याला प्रतिसाद म्हणून, औरंगाबादचे जिल्हाधिकारी यांनी कन्नडच्या सक्षम प्राधिकारी, उपविभागीय अधिकारी (डऊन्) यांना एमपीआयडी कायद्यांतर्गत १९ डिसेंबर २०२४ च्या अंतिम मुदतीपूर्वी किंवा त्यापूर्वी त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

वित्तीय संस्थांवर सहकार खात्याचे नियंत्रण नाही...

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था प्रकरणाने पतसंस्थांमधील आर्थिक गैरव्यवस्थापन आणि फसवणुकीच्या पद्धतींचा विनाशकारी परिणाम समोर आणला आहे, खूप उशीर होईपर्यंत आणि वित्तीय संस्था कोलमडण्यापर्यंत सहकार खात्याने तपासले नाही आणि नियंत्रण सुद्धा ठेवले नाही. माजी खासदार जलील सारख्या सुशिक्षित नेत्याने क्षुल्लक राजकारण न करता, थेट जनतेवर परिणाम करणारे मोठ्या प्रमाणात मुद्दे उचलून धरण्याचे काम केल्याचे या प्रकरणामुळे स्पष्ट होते.

आरोपींविरुद्ध न्यायालयाच्या ठाम भूमिकेमुळे न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली असली तरी आर्थिक वसुलीसाठी ठेवीदारांना संघर्ष सतत सुरूच ठेवावे लागणार आहे. फॉरेन्सिक ऑडिट वेळेवर पूर्ण करण्यावर आणि एमपीआयडी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर सर्वांनी लक्ष केंद्रित केले आहे, ज्यामुळे अशा फसवणुकीचे आणखी बळी पडणार नाहीत.

## अग्रलेख...

# काँग्रेसची संसद भवनातील गुंडागर्दी

संसद हे लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर मानले जाते, पण लोकशाहीच्या या मंदिरात गुरुवारी जे झाले, त्यामुळे लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या या देशातील कोट्यवधी लोकांची मान लज्जेने खाली झुकली. हेचि फळ काय मम तपाला असे म्हणण्याची वेळ त्यांच्यावर आली. जगातील काही देशातील संसदेत हाणामाऱ्या झाल्याचे याआधी वाचण्यात आणि पाहण्यातही आले होते. पण सुदैवाने आपल्या देशातील संसदेच्या सभागृहात असा प्रकार घडला नाही, म्हणून समाधान मानायचे की, सभागृहाबाहेर म्हणजे संसद भवन परिसरात असा प्रकार घडला म्हणून आपले कपाळ बडवायचे ते समजत नाही. काही असले तरी या घटनेने संसदीय लोकशाहीला काळिमा फासला गेला, हे कुणीही नाकारू शकत नाही. एखाद्या चौकात मवाल्यांनी दारू पिऊन जशी गुंडागर्दी करावी, वा महाविद्यालयीन निवडणुकीत टारगट मुलांनी जसा गोंधळ घालावा, तसा सर्व प्रकार लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसच्या खासदारांनी केला. या घटनेचे काँग्रेस खासदारांचा नंगानाच वा आधीच मर्कट त्यात मद्य प्याला, या शब्दातच वर्णन करावे लागेल. यासाठी त्यांचा करावा तेवढा निषेध कमी आहे. एखाद्या व्यक्तीवरचा राग प्रदर्शित करण्यासाठी वा त्याच्याबद्दलची तीव्र नाराजी व्यक्त करण्यासाठी 'दहा माराव्या आणि एक मोजावी', असे म्हटले जाते. पण या घटनेच्या बाबतीत तर शंभर माराव्या आणि एकही मोजू नये, असे म्हणायला हरकत नाही. राहुल गांधी आणि जबाबदारी या दोन परस्परविरोधी गोष्टी म्हणायला हरकत नाही. राहुल गांधींनी आपल्या संपूर्ण राजकीय आयुष्यात एकही गोष्ट जबाबदारीची केली नाही. त्यांची संपूर्ण वागणूक नेहमीच बेजबाबदारपणाची असते. संसदेत पहिल्यांदाच निवडून आलेल्या खासदारांनी एखादवेळ असे वर्तन केले असते तर ते खपण्यासारखे नसले तरी समजण्यासारखे होते. पण संसदेत सलग पाचव्यांदा निवडून आलेल्या राहुल गांधींनी इतके बेजबाबदार आणि मवाल्यासारखे वर्तन करावे, ते समजण्यापलीकडे आहे. राहुल गांधींनी केलेल्या धक्काबुक्कीत भाजपाचे दोन खासदार खाली पडून गंभीर जखमी झाले. यापैकी एकाचे डोके फुटले, संसद भवनाच्या पायऱ्यांवर रक्त सांडले. प्रतापचंद्र सारंगी आणि मुकेश राजपूत यांना डॉ. राममनोहर लोहिया रुग्णालयात दाखल करावे लागले. याहीपेक्षा गंभीर आणि आक्षेपार्ह प्रकार म्हणजे राहुल गांधींनी भाजपाच्या नागालॅण्डमधील खासदार फांगनोन कोन्याक यांच्याशी केलेले गैरवर्तन. याबाबतची लेखी तक्रार त्यांनी राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनकड यांच्याकडे केली तसेच राज्यसभेत आपबितीही सांगितली. कोन्याक यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले नसले तरी राहुल गांधी यांनी आपला विनयभंग केला, असाच त्यांच्या तक्रारीचा एकूण सूर होता. किमान एका महिलेशी कसे वागावे, संसदेचे सदस्य असलेल्या महिलेशी कसे वागावे, याचे भान राहुल गांधी यांना राहू नये, याचे आश्चर्य वाटते. महिला मग सर्वसाधारण गृहिणी असो, शाळेत जाणारी मुलगी असो की महाविद्यालयात जाणारी विद्यार्थिनी असो तिचा आदर आणि मानसन्मान सर्वांनी केलाच पाहिजे. आदर करता येत नसेल तरी एकवेळ चालेल पण आपल्याकडून तिचा अपमान आणि विटंबना होऊ नये, याची काळजी तर सर्वांनी घेतलीच पाहिजे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत केलेल्या विधानाचा काँग्रेस सदस्यांनी विपर्यास केला, त्यावरून शाह आणि भाजपाला अडचणीत आणण्याचा, आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसची ही कृती पूर्णपणे अश्लाघ्य अशीच आहे. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जेवढा अपमान काँग्रेसने आपल्या शासनकाळात, अगदी पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असतानापासून केला, तो लपला नाही. त्याचे ढीगभर पुरावे आहेत. काँग्रेसजनांनी डॉ. आंबेडकर यांच्याबाबतीत जी काही कारस्थाने रचली, लोकसभा निवडणुकीत ते जिंकू नये म्हणून जी षडयंत्रे केलीत, ती वाचली आणि पाहिली की काँग्रेसच्या नेत्यांच्या कुटिलतेची आणि पाताळयंत्रीपणाची आपण कल्पना करू शकतो. नेहरूंमुळे आंबेडकरांना केंद्रीय मंत्रिमंडळातून राजीनामा द्यावा लागला. मात्र त्याची कोणतीच खंत आणि वेदना नेहरूंना झाली नाही. उलट आपली एक कटकट दूर झाली, अशी तेव्हाची त्यांची भूमिका होती.

आज तेच काँग्रेसवाले अमित शाह यांनी डॉ. आंबेडकरांचा अपमान केला म्हणून जेव्हा ऊर बडवत विधवा विलाप करतात, तेव्हा आपल्याच कपाळावर आपलाच हात मारून घ्यावा लागतो. काँग्रेसवाल्यांची ही कृती 'सौ चूंहे खांके बिल्ली हज को चली'सारखी म्हणायला पाहिजे. अमित शाह यांचे डॉ. आंबेडकरांबाबतचे विधान काँग्रेस नेत्यांनी संदर्भ सोडून वापरले, यातून लोकांच्या मनात अमित शाह आणि भाजपाबद्दल कटुता निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न स्पष्टपणे दिसून येतो. अमित शाह यांचे विधान मागच्या पुढच्या संदर्भासह आपले डोके जागेवर ठेवत कोणत्याही पूर्वग्रहदूषित भावनेशिवाय ऐकले तर त्यात काहीही आक्षेपार्ह नाही, शाह यांनी जे म्हटले ते शंभर टक्के बरोबर आहे, असे समजून येईल. राहुल गांधींकडून तर संयमाच्या आणि जबाबदारीच्या वागणुकीची अपेक्षाच करता येत नाही, पण काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनीही तीच भाषा वापरावी याचे आश्चर्य वाटते. 'छोटे मियां तो छोटे मियां, बडे मियां सुभानअल्ला', असे खडगेंकडे पाहून म्हणावेसे वाटते. खडगेंबद्दल तसेच त्यांच्या वयाच्या आणि प्रदीर्घ संसदीय कारकीर्दीचा पूर्ण आदर बाळगूनही खडगे यांना म्हातारचळ तर झाला नाही, असे वाटून जाते. अन्यथा त्यांनी राहुल गांधी यांच्या सुरात आपला सूर मिसळला नसता. मी भाजपा सदस्यांना धक्काबुक्की केली नाही, उलट त्यांनीच संसद भवनात जाण्याचा माझा रस्ता अडवला आणि मला तसेच खडगे यांना धक्काबुक्की केली, असा उलटा आरोप राहुल गांधींनी करत 'चोर तर चोर वर शिरजोर'पणाचा परिचयही करून दिला. संसद भवन परिसरात काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील घटक पक्ष हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच निदर्शने करत आहेत. विरोधी पक्ष म्हणून सरकारी धोरणाचा निषेध करण्याचा, त्यांच्याविरुद्ध निदर्शने करण्याचा काँग्रेसला पूर्ण अधिकार आहे, तो कोणी नाकारणार नाही. पण सत्ताधारी पक्षाच्या विरोधात निदर्शने करण्याचा जसा अधिकार विरोधी पक्षांना आहे, तसाच अधिकार विरोधी पक्ष चुकीचा वागत असेल, समाजाच्या आणि देशाच्या विरोधात भूमिका घेत असेल तर त्यांच्याविरुद्ध निदर्शने करण्याचा, जनतेला त्याची जाणीव करून देण्याचा अधिकारही सत्ताधारी पक्षाला आहे, याचे भान राहुल गांधींनी आणि अन्य काँग्रेस नेत्यांनी ठेवले पाहिजे. सत्ताधारी पक्षाचे सदस्य निदर्शने करत असताना त्यांच्यासमोर जाण्याचा आणि त्यांना धक्काबुक्की करत आत शिरण्याचा प्रयत्न हा राहुल गांधींच्या उद्दामपणाचे तसेच काँग्रेस खासदारांच्या गुंडागर्दीचे द्योतक म्हणावे लागेल. राहुल गांधी खासदार असल्यामुळे त्यांना संसद भवनात प्रवेश करण्याचा तसेच सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्याचा पूर्ण अधिकार आहे, तो कोणी नाकारू शकत नाही. पण संसद भवनात जाण्याचा राहुल गांधींचा हेतू प्रामाणिकपणाचा असता तर संसद भवनात प्रवेश करण्यासाठी एकूण सहा प्रवेशद्वारे आहेत. मकरद्वारावर भाजपा सदस्य निदर्शने करत होते, पंतप्रधानांसाठी राखीव एक द्वार वगळले तरी उर्वरित चार द्वारातून ते आत सहजपणे जाऊ शकत होते. पण राहुल गांधी आणि काँग्रेसच्या सदस्यांचा आग्रह मकरद्वारातूनच आत जाण्याचा होता. त्यासाठी भाजपा सदस्यांना धक्काबुक्की करण्यापर्यंत तसेच महिला सदस्यांचा अप्रत्यक्षपणे विनयभंग करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. लोकसभा असो की विविध राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुका असो देशातील जनता वारंवार नाकारत असतानाही राहुल गांधींना शहाणपण येत नाही, यात नवल नाही, कारण त्यांचा आणि शहाणपणाचाही दूरदूरपर्यंत कोणताही संबंध नाही. पण त्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या मल्लिकार्जुन खडगेंसारख्या अनुभवी, संयमी आणि वयोवृद्ध नेत्यालाही शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. राहुल गांधींमागे फरफटत जात काँग्रेस पक्ष आपले कधीही भरून न निघणारे नुकसान करून घेत आहे, यात संशय नाही. ▮

## यंगिस्तान

# अण्णू गोगट्या लोकशाहीचा मारेकरी!

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**



महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांनी महाराष्ट्राच्या ओठावर हसू फुललेलं राहील याची काळजी घेतली. 'व्यक्ती आणि वल्ली' हा मराठीतला सर्वात प्रसिद्ध कथासंग्रह मानला जातो. या पुस्तकात अंतू बरवाची कथा येते. कुणी पडलं तर अंतू बरवा ओरडतो, ''अण्णू, झाला काय रे?'' रत्नागिरीत अण्णू गोगटे वकील प्रत्येक वेळी म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीत पडायचे. म्हणून पु. ल. म्हणतात, अण्णू गोगट्या होणे म्हणजे 'पडणे' हा अंतूने मराठी भाषेला बहाल केलेला वाक्प्रचार आहे. तसंच याबाबतीत काँग्रेसचे सुद्धा आभार मानणे क्रमप्राप्त आहे. कारण काँग्रेसनेही देशाला एक राष्ट्रीय 'अण्णू गोगट्या' दिलेला आहे. होय, तुम्ही अगदी बरोबर ओळखलंत. मी ५४ वर्षांचे स्वयंघोषित नेते राहुल गांधी यांच्याबद्दल बोलत आहे. राहुल गांधी राजकारणात लाँच झाल्यापासून पडत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या अनेक निवडणुकांत काँग्रेसचा वाईट पराभव झाला. तरी सुद्धा आताचा पराभव मागच्या पराभवापेक्षा बरा होता, अशा आविर्भावात ते पराभवालाच आपला विजय मानतात. ही त्यांची निरागसता नसून हा त्यांचा माजोरडेपणा आहे. काँग्रेस आणि देश आपल्या मालमत्ता असल्यासारखे ते वागत असतात.

तसेच राहुल गांधी हे अत्यंत खोटारडे देखील आहेत. ते वारंवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि स्वा. सावरकरांबद्दल खोटी विधाने करत असतात. अशा विधानांसाठी त्यांना कोर्टात माफी मागावी लागते. पण ते बाहेर येऊन पुन्हा निर्लज्जाप्रमाणे खोटी विधाने करतात. आता लोकसभेत भाषण करताना त्यांनी पुन्हा खोटारडेपणा केला. ते म्हणाले, ''सावरकरांनी स्पष्टपणे लिहिले आहे की आपल्या राज्यघटनेत भारतीय काहीही नाही. हा देश मनुस्मृतीनुसार चालला पाहिजे. त्यामुळे तुम्ही (भाजपा) राज्यघटनेचे रक्षण करण्याचा दावा करता, तेव्हा तुम्ही सावरकरांची खिल्ली उडवत आहात, त्यांची बदनामी करत आहात.'' राहुल गांधींनी हे विधान केले खरे पण त्याचा पुरावा त्यांनी दिला नाही. सावरकरांनी असे कुठे लिहिले आहे आणि कधी म्हटले आहे, हे राहुल गांधींना आयुष्यात कधीच सांगता येणार नाही. कारण सावरकरांनी असे कोणतेच विधान केले नव्हते. उलट सावरकर हे खऱ्या अर्थाने पुरोगामी होते. कोणताही धार्मिक ग्रंथ हा केवळ पूजनीय असतो, तो पूर्णपणे अनुकरणीय असेल असे नाही, असे सावरकरांचे मत होते. सावरकरांनी मनुस्मृतीचा अभ्यास करून त्यातल्या कालबाह्य गोष्टी लोकांच्या नजरेस आणून दिल्या आहेत. पण राहुल गांधींना या गोष्टी कळू शकत नाहीत. कारण ते मूर्ख आणि माजोरडे आहेत. हे दोन अवगुण जेव्हा एकत्र येतात त्यावेळी माणूस पराकोटीचा अहंकारी होतो. म्हणजे आपण कोणतेच ज्ञान मिळवू शकत नाही ही आपल्या बुद्धीची मर्यादा असते, पण आपण अत्यंत श्रीमंत आणि सत्ता असलेल्या कुटुंबात जन्मले असतो, तेव्हा कोणत्याही कर्तृत्वहीन माणसामध्ये माजोरडेपणा येतो आणि बुद्धीच्या मर्यादेवर सत्तेचं आणि श्रीमंतीचं आवरण घातलं जातं. मग निर्बुद्धपणालाच बुद्धी, ज्ञान अशी खोटी लेबलं लावत तो माणूस हिंडत राहतो. त्यांचे चेले देखील सत्तेत राहण्यासाठी, मर्जित राहण्यासाठी मूर्खपणाला 'वाह वाह' म्हणत दाद देत बसतात.

या वादात आता उद्धव ठाकरेंनी उडी घेतली आहे. आता पालिकेच्या निवडणुकीसाठी हिंदुत्वाची कातडी पांघरल्यामुळे त्यांनी राहुल गांधींचा समाचार घेत असल्याचा खोटाच आव आणला. त्यांच्या मते काँग्रेस आणि भाजपाने सावरकर-नेहरू करणे बंद केले पाहिजे. पण उद्धव ठाकरे यांना मुद्दाच कळलेला नाही. राहुल गांधी किंवा काँग्रेस सावरकरांवर टीका करत नाहीत, त्यांच्या वक्तव्याचे खंडन करत नाहीत तर ते सावरकरांवर खोटे आरोप करतात, त्यांची बदनामी करतात. जे सावरकर कधी बोललेच नव्हते, ते बोलले आहेत असं म्हणतात. भाजपाच्या नेत्यांनी सप्रमाण नेहरूंची चूक दाखवून दिली आहे. त्यास ऐतिहासिक पृष्ठभूमी आहे. खंडन करणे आणि विनाकारण बदनामी करणे यातला फरक कळायला हवा. त्यामुळे ठाकरेंनी आधी मुद्दा समजून घेतला पाहिजे, त्यानंतरच वक्तव्ये केली पाहिजे.

आता राहुल गांधींचा अहंकारी स्वभाव पुन्हा समोर आला आहे. संसदेबाहेर आंदोलनावेळी राहुल गांधींनी मुकेश राजपूत या भाजपा खासदाराला ढकललं आणि ते भाजपाचे वयोवृद्ध खासदार प्रतापचंद्र सारंगी यांच्यावर जाऊन पडले, त्यामुळे त्यांना दुखापत झाली. मुकेश राजपूत यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तिथे उपस्थित लोकांनी गांधींना जाब विचारला तेव्हा ते निर्लज्जपणे आणि उर्मटपणे बोलून तिथून निघून गेले. हा राहुल गांधींचा खरा चेहरा आहे. राहुल गांधी हे पप्पू नसून पप्पूच्या वेशात वावरणारे भयावह वृत्तीचे व्यक्ती आहेत, असे कोणी म्हटले तर खोटे ठरणार आहे का? काँग्रेस हा पक्ष राहुल आणि सोनिया गांधींच्या पूर्णपणे आहारी गेल्यामुळे आता या पक्षाची निष्ठा देशाबद्दल राहिली नसून त्यांनी ती सोनिया आणि राहुल चरणी वाहिली आहे. त्यामुळे लोकशाही आणि संविधानाला बाधा पोहोचेल अशा गोष्टी ते करत असतात. त्यात राहुल हे त्यांचं प्रमुख नेतृत्व अत्यंत अहंकारी असल्यामुळे सबंध काँग्रेस पक्ष हा अहंकारी झालेला आहे.

अमित शाह यांच्या भाषणातला छोटा भाग काढून त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान केला असा खोटा आरोप काँग्रेस राहुल गांधींच्या नेतृत्वात करत आहे. त्यांचा सर्वोच्च नेताच खोटारडा, माजोरडा आणि अहंकारी असेल तर बाकी त्यांच्या ताटाखालचं मांजर झालेले त्यांचे इतर नेते दुसरं काय करणार? त्या भाषणात खरं तर अमित शाह यांनी बाबासाहेबांचा गौरव केला असून काँग्रेसने या महामानवाला कसा त्रास दिला हे पुराव्यानिशी सिद्ध केलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा काँग्रेसवर टीका केलेली आहे. मात्र सत्य परिस्थिती न जाणून घेता किंवा मान्य न करता राहुल गांधी आणि त्यांचे चेले देशात अराजकतेचे वातावरण निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण करत आहेत. टूलकिट प्रकरणातही त्यांनी अशीच भूमिका घेतली होती. मग राहुल गांधी डीप स्टेटच्या साहाय्याने भारताचा बांगलादेश करायला निघाले आहेत अशी शंका जर कुणी व्यक्त केली तर त्यात काही वावगे ठरणार आहे का? प्रत्येक भारतीयांना राहुल गांधींच्या निष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. सावरकरांसारख्या देशभक्ताला बदनाम करून राहुल गांधी देशात अस्थिरतेचं वातावरण निर्माण करत आहेत. आता हीच वेळ आहे काँग्रेसने या अहंकारी व्यक्तीला पक्षातून काढून संविधान आणि लोकशाहीचं रक्षण केलं पाहिजे. नाहीतर ड्युप्लिकेट गांधी कुटुंबाचा हा अण्णू गोगट्या काँग्रेसची पूर्ण वाताहत करून टाकेल, तसेच या गोष्टी देशासाठी, लोकशाहीसाठी व संविधानासाठीही घातक ठरतील. सरकारने देखील राहुल गांधींच्या अशा खोट्या वक्तव्यांसाठी आणि वर्तणुकीसाठी त्यांना शासन केले पाहिजे. ▮

writerjayeshmestry@gmail.com

## थेट विधिमंडळातून


# सामान्यातील असामान्य व्यक्तिमत्त्व!

**नागेश दाचेवार**

दुसऱ्यांच्या शेतात सालकरी गडी म्हणून, मोलमजुरी करून आयुष्य घालवणाऱ्या शेतमजूर असलेल्या शंकरराव शिंदे यांच्या गरीब कुटुंबातील, धनगर समाजातील एक पोर आता राज्याच्या सर्वोच्च सभागृहाचा प्रमुख झालाय्!... त्याचं नाव आहे प्रा. राम शिंदे... अत्यंत हालाखीच्या परिस्थितीतून जडघडण झालेल्या, चौंडी विकास प्रकल्पाचे सदस्य, सरपंच ते आमदार असा प्रवास असणाऱ्या राम शिंदेंची आता विधान परिषदेच्या सभापतिपदी निवड झाली आहे.

पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांच्या माहेरचे नववे वंशज. माजी मंत्री, आमदार, प्राध्यापक राम शिंदे या संघर्षवीराचा जन्म अहल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) जिल्ह्यातील कर्जत जामखेड तालुक्याच्या चौंडी या अत्यंत छोट्याशा अर्थात त्याकाळी दोन पाचशे लोकसंख्या असलेल्या आणि आजही दोन, चार हजारापलीकडे लोकसंख्या नसलेल्या गावी १ जानेवारी १९६७ रोजी शेतमजूर असलेल्या शंकरराव शिंदे यांच्या घरी झाला. घरातलं अठराविश्व दारिद्र्य असलेल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह हा एक प्रश्न उभा ठाकला असताना, घरच्या परिस्थितीवर मात करत राम शिंदे यांनी उच्च शिक्षण घेतले. एम.एस्सी., बी.एड. पर्यंत शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी बीड जिल्ह्यातील आष्टी येथील एका महाविद्यालयात सुरुवातीच्या काळात १९९२-९३ मध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. दरम्यान, १९९५ मध्ये युतीचे सरकार आले तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमानिमित्त चौंडी येथे आले होते. तेव्हा त्यांनी चौंडी विकास प्रकल्पाचा पाया ठेवला. आणि या प्रकल्पानेच महाराष्ट्राला दिला चौंडीच्या मातीतील हा हिरा...

पण हा प्रवास राम शिंदेंसाठी काही सोपा नव्हता. चौंडी विकास प्रकल्पासाठी नोकरी सोडून स्वतःला वाहून घेतले. त्यानंतर १९९७ साली भाजपाने पंचायत समिती लढविण्याची संधी शिंदेंना दिली. मात्र, त्यांचा या निवडणुकीत पराभव झाला, यश मिळू शकले नाही. तब्बल तीन वर्षांनंतर २००० साली चौंडी ग्राम पंचायतीच्या निवडणुकीत मात्र यश मिळाले. त्यानंतर सलग पाच वर्षे ते सरपंच राहिले. पण यादरम्यान, लढविलेल्या बाजार समितीच्या निवडणुकीत पराभव झाला. नंतर जिल्हा परिषदेचं तिकीट कापलं गेलं. आणि त्यापाठोपाठ २००५ मध्ये ग्राम पंचायतीतदेखील पराभवाला सामोरे जावे लागले. राजकारणात उतरती कळा लागल्याचे वाटू लागले असताना, २००७ च्या पंचायत समिती निवडणुकीत राम शिंदे यांच्या पत्नी आशाताई शिंदे या विजयी झाल्याने, शिंदेंना थोडासा दिलासा मिळाला. या राजकीय खडतर प्रवासादरम्यान, राम शिंदेंनी २००४ ते २००६ भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष, २००६ ते २००९ भाजपा जामखेडचे तालुकाध्यक्ष, अशा जबाबदाऱ्या निभावल्या. त्यानंतर भाजपाने २००९ साली शिंदे यांना नव्याने तयार झालेल्या कर्जत-जामखेड या विधानसभा क्षेत्राची उमेदवारी दिली आणि प्रा. राम शिंदे यांचा विधानसभेत विजय होऊन, राज्याच्या राजकारणात उदय झाला. विरोधात असतानादेखील या भागात केलेल्या विकास कामांच्या जोरावर राम शिंदे २०१४ च्या विधानसभेतदेखील सलग दुसऱ्यांदा मोठ्या फरकाने विजयी झाले. २०१४ मध्ये महायुती सरकार महाराष्ट्रात आलं. या सरकारमध्ये २०१४-२०१६ या काळात गृह, कृषी, आरोग्य व पर्यटन विभागाच्या राज्यमंत्रिपदाची जबाबदारी शिंदेंनी सांभाळली. यावेळी त्यांनी एक जागरूक गृहराज्यमंत्री म्हणून आपली ओळख निर्माण केली. त्यापाठोपाठ सन २०१६-२०१९ या दरम्यान जलसंधारण, राजशिष्टाचार, ओबीसी कल्याण, वस्त्रोद्योग व पणन या विभागाचे कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांची बढती झाली. याच दरम्यान त्यांनी संघटनात्मक जबाबदाऱ्यादेखील पार पाडल्या. २०१० ते २०१२ अहल्यानगर जिल्हाध्यक्ष, २०१३ ते २०१५ भाजपाचे राज्याचे सरचिटणीस, २०२१ प्रदेश उपाध्यक्ष, २०२२ भाजपा कोअर कमिटी सदस्य म्हणून प्रभावी काम केले. बऱ्याच काळानंतर राम शिंदेंना पुन्हा एकदा २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. पराभव झाल्यानंतर शिंदे यांना पक्षाने विधान परिषदेवर पाठविले. दरम्यान, शिंदे विधान परिषदेचे आमदार असताना त्यांनी २०२४ ची विधानसभा लढविली मात्र, त्यात देखील अपयश आले. मात्र, आपल्या कर्तृत्वाचा ठसा तर त्यांनी आधीच उमटवला होता. त्यामुळे विधान परिषदेच्या १९ व्या सभापतिपदी प्रा. राम शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली. पक्षाने विधान परिषदेसारख्या वरिष्ठ सभागृहाच्या सभापतिपदी निवड करत एका सामान्य कुटुंबातल्या उच्चशिक्षित व्यक्तीचा सन्मान केला. राम शिंदे हे पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांच्या माहेरचे नववे वंशज, परिवारातील सदस्य, अर्थात अहल्यादेवींचे वडील मानकोजी शिंदे यांच्या नवव्या पिढीतील वारसदाराच्या रूपानं, राजमाता, राष्ट्रमाता अहल्यादेवींच्या ३०० व्या जयंतीसारख्या महत्त्वाच्या वर्षी या सर्वोच्चपदावर बसले आहेत. हा एकप्रकारे अहल्यादेवींचाच सन्मान असल्याची भावना आता व्यक्त केली जात आहे.



राम शिंदे यांच्या या नियुक्तीच्या निमित्ताने आणि त्यांच्या खडतर प्रवासाच्या निमित्ताने सामान्यातून असामान्य व्यक्तिमत्त्व कसं घडतं याचं उत्तम उदाहरण महाराष्ट्राला बघायला मिळालं. आता सभागृहाला, सभागृहातील सदस्यांना आणि त्या माध्यमातून राज्यातील जनतेला न्याय देण्याची मोठी जबाबदारी राम शिंदेंच्या खांद्यावर आली आहे. पुण्यश्लोक अहल्यादेवींचे वारस म्हणून अहल्यादेवींचा जो बाणा होता, त्याच बाण्याने काम करत या महाराष्ट्राला विकसित महाराष्ट्राकडे नेण्याचा शिवधनुष्य पेलायचा आहे. ▮

९२७०३३३८८६

## वेध

**हेमंत सालोडकर**

# लाडक्या भावाची वेडी माया

महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात सुरू आहे. पहिले मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीनंतर काही दिवसांच्या अंतराने सुमारे ३९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आणि १६ डिसेंबरपासून विधिमंडळाचे अधिवेशन सुरू झाले. पहिल्या दिवसापासूनच महायुतीच्या सरकारने कामाचा धडाका लावला आणि सर्वच क्षेत्रांना भरपूर निधी दिला. यात युवकांपासून तर उद्योगापर्यंत, शेतीपासून तर सिंचनापर्यंत सर्वांचा समावेश होता. पण ज्या योजनेमुळे महायुतीला भरघोस मताधिक्य मिळाले आणि दणदणीत विजय झाला, त्या योजनेच्या शिल्पकार असलेल्या लाडक्या बहिणींना काही आनंदवार्ता मिळत नव्हती. त्यामुळे विरोधकांनीही आता या योजनेचे काय होणार, असा कांगावा सुरू केला. निवडणुकीपूर्वी पाच महिन्यांचे ७५०० रुपये जमा झाले आणि लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पारड्यात मतांचे भरभरून दान दिले. अर्ज करणाऱ्या सर्वच महिलांना याचा भरपूर लाभ झाला. ज्यांची आर्थिक स्थिती चांगली होती, त्यांनीही याचा लाभ घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल्याप्रमाणे काही पुरुषांनी खाती उघडून लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला. समाजात प्रामाणिक लोकांसोबत अप्रामाणिक लोकही असतात. त्यांच्याकडून दुसरी अपेक्षा करता येणार नाही. काही दिवसांपूर्वी या योजनेसाठी सर्वेक्षण करून गैरफायदा लाटणाऱ्या लोकांना योजनेतून हद्दपार करणार असे ऐकण्यात आले. बेईमानी करून बहिणींच्या नावावर पैसे लाटणाऱ्यांची चौकशी केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. निवडणुकीत १५०० च्या ऐवजी २१०० रुपये देण्यात येईल, अशीही घोषणा झाली. त्यामुळे महिलांच्या आनंदाला तर उधाण आले आणि त्यांनी महायुतीला भरघोस मतांनी विजयी केले. ज्या विरोधकांनी या योजनेला विरोध केला, त्यांनीही आम्ही निवडून आल्यास ३००० रुपये देऊ अशी घोषणा करून टाकली. महायुतीचे सरकार निदान १५०० रुपये देत होते, पण विरोधक कुठून पैसे देणार याची आकडेवारी त्यांनी दिली नाही आणि लाडक्या बहिणींनी त्यांना विरोधात बसवले. नुसते बसवलेच नाही तर विरोध करायला नेताही शिल्लक ठेवला नाही. तुमचा नेताही नको आणि पैसेही नको अशी स्थिती महिलांनी विरोधकांची केली.

निवडणुका झाल्यानंतर मात्र लाडक्या बहिणींना आपले पैसे कधी मिळणार याची हुरहूर लागली. पण निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार, महायुती सरकार हिवाळी अधिवेशन संपताच बहिणींच्या खात्यात पैसे जमा करणार असे खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच घोषित केले. त्यामुळे लाभार्थी महिला आनंदल्या. पात्र महिलांना पैसे मिळतील यात गैर काही नाही, पण काही श्रीमंत लोकही या योजनेचा लाभ घेत असतील तर त्यांची चौकशी करून त्यांना बाद केले पाहिजे आणि सरकारवरील आर्थिक बोझा कमी केला पाहिजे.

काही पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. अशा 'लाडक्या भाऊ' आणि 'लाडक्या जावईबापूंचीही' चांगली 'सोय' लावली पाहिजे. विधानसभेत सांगितल्याप्रमाणे त्यांची चौकशी होईलच. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सहावा हप्ता काही दिवसांतच मिळणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस राज्यातील महिलांना आणि सभागृहाला आश्वस्त करताना म्हणाले, कोणतीही शंका मनात ठेवू नका, जी जी आश्वासने आम्ही दिलेली आहेत, ज्या योजना आम्ही लागू केल्या आहेत, त्यातील एकही योजना बंद होऊ देणार नाही. ज्या लाडक्या बहिणींनी महायुतीवर विश्वास दर्शवला आणि मतांचं भरभरून दान दिलं, त्यांच्या खात्यात हे अधिवेशन संपल्याबरोबर डिसेंबर महिन्याचा हप्ता टाकणार आहोत. सोबतच लाडकी बहीण योजनेचे कोणतेच निकषही बदलले नाहीत, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. पण हे सांगताना त्यांनी काही जणांची पोलखोलही केली. ते म्हणाले की, काही जणांनी चार चार खाती उघडल्याचे लक्षात आले आहे. अशा लोकांवर त्यांनी संतापही व्यक्त केला. समाजात चांगल्या प्रवृत्ती असतात, तशा काही वाईट प्रवृत्तीही असतात. एखादी योजना चुकीच्या पद्धतीने वापरत असेल तर जनतेचा पैसा आहे, तुमची आमची जबाबदारी आहे, तो योग्य प्रकारे गेला पाहिजे. माणसांनीच ९ खाती काढलीत त्याला लाडकी बहीण कसे म्हणायचे, असा सवालही त्यांनी सभागृहात केला. बहिणींच्या पैशांवर ज्याचा डोळा आहे, तो लाडका भाऊ कसा? अशी विचारणा मुख्यमंत्र्यांनी केली. सोबतच शेतकरी, युवक, ज्येष्ठ नागरिक, वंचितांच्या संदर्भात दिलेली आश्वासने महायुती सरकार पूर्ण करेल, असे वचनही त्यांनी दिले. या घोषणेमुळे त्यांची बहिणींवरील माया लक्षात येते. त्यामुळे आता लाडक्या बहिणींना प्रतीक्षा आहे ती देवाभाऊंनी खात्यात ओवाळणी टाकण्याची. ▮

९८५०७५३२८१

## वाचक पत्रे

### डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा हा अपमानच नव्हे काय?

डॉ आंबेडकरांनी संविधान सभेत मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून केलेल्या भाषणात, जॉन स्टुअर्ट मिल आणि आयरिश देशभक्त डॅनियल ओ'कॉनेलच्या विधानांचा संदर्भ देऊन म्हटले होते की, देशासाठी आयुष्यभर सेवा देणाऱ्या महापुरुषांप्रति कृतज्ञता बाळगण्यात गैर काहीच नाही. पण कृतज्ञतेला मर्यादा आहेत ही खबरदारी बाळगणे इतर कोणत्याही देशांपेक्षा भारताच्या बाबतीत कितीतरी जास्त आवश्यक आहे. कारण जगातील इतर कोणत्याही देशाच्या राजकारणात घेतल्या जाणाऱ्या भूमिकेच्या तुलनेत भारतात भक्ती किंवा ज्याला व्यक्ती-पूजेचा मार्ग म्हटले जाऊ शकते, ती महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. धर्मातील भक्ती हा आत्म्याच्या मोक्षाचा मार्ग असू शकतो. पण राजकारणात, भक्ती किंवा व्यक्ती-पूजा हा अधोगतीचा आणि लोकशाहीसाठी धोक्याचा मार्ग आहे. भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळात होऊन गेलेल्या महान व्यक्तिमत्त्वांनी आपले विचार समाजात रुजवले आणि त्या विचारांनी प्रेरित होऊन घडलेल्या जनमानसाने भारताला आजचे सार्वभौमत्व प्राप्त झाले. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात या महनीयांच्या विचारांचे डोळस अनुकरण आणि अनुसरण होण्याऐवजी केवळ त्यांचे प्रतिमा पूजनाला समाजातील बहुतांश घटकांकडून प्राधान्य दिले गेले. भारतात या महापुरुषांच्या पुतळ्यांच्या संख्येवरून आपल्याला हे सहज लक्षात येईल. काल संसदेत झालेला प्रकार संविधान निर्मात्यांनी त्यावेळी दिलेल्या धोक्याच्या सूचनेचा प्रत्यय देणारा आहे. बाबासाहेबांच्या त्या विचारांचा आपल्याला विसर पडला आहे का ? आणि कां?

**प्रसाद पोफळी**/९८२२५६९६४८

●● ●●

### धर्मप्रेमी लोकप्रतिनिधींचे त्रिवार अभिनंदन

नुकत्याच महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका होऊन हिंदुत्ववादी सरकार सत्तेत आले. सध्या हिवाळी अधिवेशन सुरू आहे. त्यानिमित्ताने 'धर्मप्रेमी लोकप्रतिनिधींचा सत्कार सोहळा' महाराष्ट्र मंदिर संघ आणि हिंदू जनजागृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला. यापूर्वी अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन झाल्याचे बघण्यात आले नव्हते. या शानदार आयोजनासाठी आयोजक समितीचे मनःपूर्वक आभार! हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी केलेला प्रचार, संतांचे आशीर्वाद आणि जागृत मतदारांनी केलेल्या मतदानामुळे राज्यात हिंदुत्वनिष्ठ सरकार झाले. या निवडणुकीत 'व्होट जिहाद विरुद्ध धर्मनिष्ठ शक्ती' असे स्पष्ट समीकरण होते, ज्यात महायुतीला भरघोस यश मिळाले, ते त्यांनी हिंदुत्वाचा मुद्दा खंबीरपणे मांडल्यामुळे. आता या यशानंतर, लोकप्रतिनिधींनी दिलेल्या आश्वासनांना जागून त्या आश्वासनांची पूर्तता होणे अपेक्षित आहे. धर्मांतरण, लव्ह जिहाद, मंदिरांचे सरकारीकरण यासारख्या प्रलंबित विषयांवर त्वरित कठोर कायदा लागू करावा. तसेच लॅण्ड जिहाद रोखण्यासाठी वक्फ बोर्ड कायदा रद्द करण्यात यावा. या दिशेने सरकारने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा आहे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

### पुन्हा सोलापूरच्या पदरी निराशाच

महायुतीचे सरकार आले आणि येथे परत एकदा सोलापूरकरांच्या आशा पल्लवीत झाल्या. ४ आमदार भाजपाला निवडून दिले आहेत. निदान या वेळेस तरी मंत्रिमंडळात सोलापूरला स्थान मिळेल अशी आशा होती. सोलापूरला विमानतळ झाले. आता तरी फरक पडेल. तसेच आमदार मंत्री झाले तर सोलापूरच्या विकासात अजून भर पडली असती.

औद्योगिक वसाहत 'जैसे थे'च आहे. त्यात वाढ करणे गरजेचे आहे. सोलापूरचा विकास हा नगरसेवक, आमदार, खासदार यांच्या इच्छाशक्तीच्या जोरावर होत असतो. काळाचा रोख बघता केंद्रीय सरकार बघून सोलापूरकरांनी भाजपाच्या पदरात मत टाकून त्यांच्यावर जबाबदारी टाकली आहे. मुख्यमंत्र्यांनी विशेष लक्ष घालून सोलापूरच्या विकासात हातभार लावावा. तसेच विद्यमान आमदारांनीही तसे प्रयत्न करावे. सोलापूर जिल्ह्यातील मतदारांनी विश्वास टाकला आहे त्याचे सार्थक करावे.

**श्रीपाद अशोक महाजन**/सोलापूर

### बुद्धिबळपटू डी. गुकेशचे यश युवांसाठी प्रेरणा

भारताचा युवा बुद्धिबळपटू डी. गुकेश याने जागतिक बुद्धिबळ स्पर्धेच्या महाअंतिम सामन्यात चिनी ग्रॅण्ड मास्टर डिंग लिरेन याला नमवत इतिहास घडवला. अवघ्या १८ व्या वर्षी जागतिक स्पर्धा जिंकून गुकेशने आपणच बुद्धिबळाच्या पटावरील नवा राजा असल्याचे सिद्ध केले. ग्रॅण्डमास्टर विश्वनाथन् यांच्यानंतर अशी कामगिरी करणारा तो दुसरा भारतीय बुद्धिबळपटू आहे. अवघ्या अठराव्या वर्षी ही कामगिरी करून डी. गुकेशने जगातील सर्वांत तरुण विश्वविजेता होण्याचा मान मिळवला आहे. त्याची कामगिरी पाहून अनेक जण बुद्धिबळाकडे वळतील. डी. गुकेशची कामगिरी भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे. विश्वविजेता डी. गुकेशचे मनापासून अभिनंदन! ▮

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# शहरातील रस्त्याच्या कामाची नऊ महिने निविदा का उघडली नाही याची चौकशी करा

## आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत केली मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

धाराशिव शहरातील रस्त्यांसाठी १४० कोटींचा निधी मंजूर झाला होता. या कामांची निविदा २९ मार्च २०२४ रोजी उघडणे अपेक्षित होते. मात्र नऊ महिने उलटूनही निविदा उघडली नाही. कामे न झाल्याने कित्येक अपघात झाले, नागरिकांचे बळी गेले आहे. याला जबाबदार कोण? असा सवाल करत विलंब का लागला याची चौकशी करावी अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत केली.



आमदार पाटील म्हणाले की, महाविकास आघाडी सरकार असताना धाराशिव शहरातील रस्ते, उद्यान, आठवडी बाजारासाठी निधी मंजूर झाला होता. आपण सरकारसोबत न गेल्याने या कामांना महायुतीने स्थगिती दिली. त्याविरोधात उच्च न्यायालयात गेलो. न्यायालयाने स्थगिती उठवण्याचा निर्णय दिला. मात्र, शासनाचा नगरविकास विभाग इतका निगरगट्ठ आहे की अजूनही स्थगिती उठविली नाही. किमान आता तरी उच्च न्यायालयाचा आदर राखून ही स्थगिती उठविण्याची मागणी आमदार पाटील यांनी सभागृहात केली.

शहरातील स्ट्रीट लाईटचे टेंडर गुजरातच्या एका कंपनीला दिले असून त्यांचं बिल थकल्याने काहीच काम होत नाही शिवाय नगरपालिकेने हे काम त्या कंपनीकडून काढून घ्यावे असे पत्र दिले तरीही शासनाने याबाबत काहीच केलेलं नाही. या गंभीर समस्येचे वास्तव सभागृहाच्या आमदार पाटील यांनी निदर्शनास आणून दिले. धाराशिव येथे १५ मार्च २०२४ रोजी ५०० बेडचे हॉस्पिटल मंजूर करुन त्याचे उद्घाटनही तत्कालीन मुख्यमंत्री यांनी केले होते. हा प्रकल्प ३६१ कोटींचा आहे. मात्र, यासाठी तरतूद केवळ १ हजार तरतूद केली असून त्यामागून मंजूर महाविद्यालयाना निधी दिला जातो पण धाराशिवला का नाही असा सवाल आमदार पाटील यांनी उपस्थित केला.

हे सरकार मराठवाड्यावर अन्याय करत असल्याचा थेट पुरावाच आमदार पाटील यांनी सभागृहा समोर मांडला. पार गोदावरी खोऱ्यातुन मराठवाड्याला पाणी देण्याचा प्रकल्प २०१३ मध्ये मंजूर केला पण त्याच पुढे काहीच झालं नाही मात्र मागुन मंजूर झालेल्या पार गिरणा प्रकल्पाचे काम सुरु देखील झाले. शिवाय कृष्णा मराठवाडा प्रकल्पाला निधी वितरण पुरेसं होत नसल्याच वास्तव आमदार पाटील यांनी मांडल. यासाठी मराठवाडा येथील सर्वच लोकप्रतिनिधीनी या अन्यायाविरुद्ध एकत्र आलं पाहिजे अशी भूमिका त्यानी मांडली.

### संकल्पपत्राची आठवण ठेवा...

आमदार पाटील यांनी भाजपने निवडणुकीत दिलेले आश्वासनाच संकल्पपत्रच सभागृहात दाखवल. त्यातील शेतकऱ्यांना तीन लाखाची कर्जमाफी देणार म्हणालात तस आता बहुमत मिळालं असून शेतकरी कर्जमाफीच्या घोषनेची वाट पाहत आहे असे पाटील यांनी मुख्यमंत्री यांना सांगितले. तसेच शेतकऱ्यांना खत, औषध व साधनसामुग्रीवरील राज्याच्या वाट्याचा जीएसटी अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना परत करण्याचा शब्द आपण संकल्पपत्रात केला होता त्याची अंम लबजावणी कधीपासून करणार याबद्दलही सरकारने उत्तर द्यावे असं पाटील यांनी सांगितले.

# ४ कोटी ५० लाख रुपये खर्चाची विकास कामे सध्या प्रगतीपथावर : मुख्याधिकारी कुंभार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ डिसेंबर -**

नळदुर्ग नगरपालिकेवर प्रशासकीय कालावधी असताना सन २०२२ ते २०२४ या दोन वर्षाच्या कालावधीत नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी अतिशय चांगल्या प्रकारे विकास कामांचे नियोजन करुन तब्बल ४ कोटी ७५ लाख रुपये खर्चाची विकास कामे पुर्ण करुन शहराचा विकास केला आहे. त्याचबरोबर ४ कोटी ५० लाख रुपये खर्चाची विकास कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे प्रशासकीय कालावधीत मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला आहे.

नगरपालिकेवर गेल्या तीन वर्षांपासुन प्रशासकीय कारभार सुरु आहे. प्रशासकीय कालावधीत नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परीक्षेत्रात अधिसुचित क्षेत्रात नागरी सेवा पुरविणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाअभियान योजना, वैशिष्ट्येपुर्ण योजना व नळदुर्ग नगरपरिषद जिल्हा नियोजन समिती या योजनेअंतर्गत शहरातील विविध भागात कोट्यावधी रुपये खर्चाची विकास कामे केली आहेत. यामध्ये सन २०२२-२३ या वर्षात एकुन ३२ कमांपैकी २३ कामे पुर्ण केली आहेत या २३ कामांवर ३ कोटी ६३ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. या वर्षातील २९ लाख रुपये खर्चाची २ कामे प्रगती पथावर आहेत. २०२३-२४ या वर्षात विविध योजनेअंतर्गत एकुन ३३ कामांना मंजुरी मिळाली आहे. यापैकी ८ कामे पुर्ण झाली आहेत तर ८ कामे प्रगतीपथावर आहेत. या वर्षात १ कोटी रुपये खर्चाची विकास कामे पुर्ण झाली आहेत तर सध्या ४ कोटी रुपये खर्चाची विकास कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०२४-२५ या चालु वर्षात ५ कोटी रुपये खर्चाच्या विकास कामांना मंजुरी मिळाली असुन या कामाची टेंडर प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे. मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी प्रशासकीय कालावधीत शहरात विकास कामे करीत असतांना सर्व जाती धम तील लोकांसाठी ही विकास कामे केली आहेत. त्यामुळे प्रशासकीय कालावधीत मुख्याधिकारी कुंभार यांनी शहराचा विकास थांबु न देता तो वेगाने पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी केलेला योग्य व अचुक प्रस्ताव तसेच आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी शासन दरबारी केलेल्या प्रयत्नाम ळे आज नळदुर्ग शहरात ४६ कोटी रुपये खर्चाच्या पाणिपुरवठा योजनेचे काम सुरु आहे. हे काम पुर्ण झाल्यानंतर शहरवासियांना दररोज पाणी मिळणार आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### प्रेमकुमार राजाराम गुंड यांच्या रेल्वे भरतीतील निवडी बद्दल सत्कार

**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

डॉ. वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकुल येथील एस.पी. पॉलिटेक्निक मध्ये तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेला विद्यार्थी प्रेमकुमार राजाराम गुंड यांची भारतीय रेल्वेमध्ये टेक्निकल विभागात क्लैज अँड वॅगनपदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचा एस.पी. पॉलिटेक्निकच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना गुंड यांनी सांगितले की,कॉलेजमध्ये चालू असलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्राचा फायदा झाला आहे. इतर विदयार्थ्यांनी ही त्याचा फायदा घ्यावा. या यशाबद्दल धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील प्राचार्य अमरसिंह कवडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



### बप्पांच्या पुण्यतिथीनिमित्त संस्थेच्या शाखेत विविध कार्यक्रमाचे आयोजन

**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सरचिटणीस गुरुवर्य के.टी. पाटील सरांच्या पुण्यतिथी निमित्त प्रशालेच्या भव्य प्रागंणावरील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील, तुळजाभवानी बँकेचे अध्यक्ष संजय पाटील, अखिल भारतीय वारकरी मंडळाचे अध्यक्ष हभप. प्रकाश बोधले महाराज व संस्था सरचिटणीस प्रेमाताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील युवा उद्योजक अभिराम पाटील यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यानंतर प्रशालेच्या मुख्य इमारतीत हभप. प्रकाश बोधले महाराज यांनी कीर्तनातून थोरांचे पुण्यस्मरण का करावे शिक्षणक्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवून इतिहास उभ्या करणारे कै.के.टी. पाटील सरांच्या कार्यांचा उजाळा या निमित्ताने दिला. या कार्यक्रमास त्यांचे आतेष्ट व माजी विद्यार्थी, धाराशिव नगरातील बप्पांवर प्रेम करणारे नागरिक, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.



### निराधारांना बालसंगोपन योजनेचा मोठा आधार : दयानंद काळुंके

**इटकळ, दि.२१ डिसेंबर -**

घरातल्या घरकर्त्याचे अचानकच निधन झाले, कुटुंब, मुलं बाळं उघड्यावर पडले त्यामुळे मुलांची शाळा बंद करुन बालविवाहासारखा विचार, आत्महत्येसारखा विचार डोक्यातून काढून महाराष्ट्र शासनाच्या सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना पदरात पाडून घ्यावी, निराधारांना बालसंगोपन योजनेचा मोठा आधार आहे असे मत धाराशिव जिल्हा बालकल्याण समितीचे सदस्य तथा पत्रकार दयानंद काळुंके यांनी व्यक्त केले. जि.प.प्रा. शाळा निलेगाव येथे आयोजित केलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय योजना या चर्चासत्रात दयानंद काळुंके बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी जाधव हे होते. तर प्रमुख पाहुण्या म्हणून आशा कार्यकर्ती तनुजा वाघाळे, अलका मुळे यांची होती. पुढे बोलताना दयानंद काळुंके म्हणाले की ही योजनेचा लाभ घरातील दोन बालकांना देता येतो, मासिक बावीससे पन्नास रुपये एका बालकांना मिळतात, यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, प्रस्ताव महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात दाखल करावीत, असे आवाहन काळुंके यांनी शेवटी केले. यासाठी मुख्याध्यापक शिवाजी जाधव, गुरुलिंग ढावणे, शुभदा कुलकर्णी, बसवेश्वर परकाळे, शिवानंद ढम्मे, राजेंद्र सुतार, गोविंद नांदे यांनी यासाठी पुढाकार घेतला होता.

### हसरी शाळा या बाल काव्यसंग्रहास उत्कृष्ट बाल वाड.मयाचा पुरस्कार

**तेर, दि.२१ डिसेंबर -**

प्रतिभा जगदाळे यांच्या हसरी शाळा या बाल काव्यसंग्रहास, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर,



यांचा २०२४ चा 'उत्कृष्ट बाल वाङ्मयाचा' पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार, शाहू स्मारक भवन सभागृह, दसरा चौक, कोल्हापूर येथे भारतीय साहित्य समीक्षक आणि भाषाशास्त्रज्ञ, पद्मश्री डॉ. गणेश देवी आणि माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी दमसासचे अध्यक्ष प्रा. भीमराव धुळबुळू, विजय चोरमारे, दि.बा. पाटील, डॉ. विनोद कांबळे, डॉ. रामकली पावसकर आणि मान्यवर उपस्थित होते.

### महानोर यांच्या पुस्तकाची निवड

**जळकोट, दि.२१ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मुर्टा येथील प्राथमिक पदवीधर शिक्षिका श्रीमती बबीता महानोर यांची समग्र शिक्षा आणि पीएश्री ग्रंथालय उपक्रम अंतर्गत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिव जिल्ह्यातून मुलांनो, आपण बोलू या...या पुस्तकाची उत्तम ग्रंथ म्हणून राज्यस्तरावर निवड झाल्यामुळे जळकोट बीटच्यावतीने जिल्हा परिषद प्रशाला, जळकोट या ठिकाणी सत्कार करण्यात आला.

# येरमाळा येथे धाराशिव जिल्हा-स्तरीय उल्हास मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२१ डिसेंबर -**

येरमाळा येथील विद्यानिकेतन विद्यालय येथे, शिक्षणाधिकारी योजना जिल्हा परिषद धाराशिव आयोजित, उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत धाराशिव जिल्हास्तरीय उल्हास मेळावा २०२४-२५ चे आयोजन श्रीमती सुधा साळुंखे शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद धाराशिव यांनी विद्यानिकेतन विद्यालय येरमाळा येथे आयोजन केले होते.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन म ाननीय डॉ. मैनाक घोष भाप्रसे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा जिल्हाधिकारी धाराशिव यांनी केले. यावेळी या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती डॉ. गणपत मोरे, डॉ. अंजली सूर्यवंशी, अशोक पाटील, गजानन वाघमारे, सराफ, खुळे, फुलारी, देवगुडे, सरार सय्यद, इमानदार, शिवकुमार बिराजदार, सुभाष चव्हाण, भूमराहुल भट्टी, अर्जुन जाधव, सोमनाथ घोलप, धर्मराज काळमांते प्रत्येक तालुक्याचे सर्व गटशिक्षणाधिकारी यांची उपस्थिती होती. नव साक्षर भारत अंतर्गत शैक्षणिक साहित्याचे मेळाव्यात १५ स्टॉल लावण्यात आले होते. यात शिक्षकांनी टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू व शैक्षणिक साहित्याची निर्मिती याची मांडणी करण्यात आली होती. ावेळी धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून शाळातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमांमध्ये पथनाट्य, लोकगीते, नाटिका, इत्यादीचे सादरीकरण केले. कार्यक्रमासाठी सूत्रसंचालन संतोष म ाळी विस्तार अधिकारी धाराशिव यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यानिकेतन विद्यालयाचे संस्थापक सचिन पाटील, संचालिका स्वाती पाटील तसेच विद्यानिकेतन शैक्षणिक संकुलातील सर्व कर्मचाऱ्यांनी यांनी परिश्रम घेतले.

✻ **धाराशिव** - महाराष्ट्र कोळी समाज संघ धाराशिव व कै. शामल कोळी वधु-वर सुचक सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी २५ डिसेंबर रोजी स. १० वाजेपासून सायंकाळी ५ पर्यंत कोळी महादेव समाजाचा वधु-वर सुचक मेळावा व अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळविण्या करीता कायदेविषयक मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

# मानसिक, शारीरिक बौद्धिक विकासासाठी ध्यानधारणा आवश्यक : दिगंबर कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ डिसेंबर -**



श्री छत्रपती शिवाजी म हाविद्यालयात एनसीसी, एनएसएस, करिअर कट्टा अंतर्गत आंतरराष्ट्रीय ध्यानधारणा दिवस साजरा करण्यात आला. यावर्षापासुन पासून संपूर्ण जगामध्ये आंतरराष्ट्रीय ध्यानधारणा दिवस साजरा करण्यात येत आहे या अनुषंगाने महाविद्यालयात कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी श्री श्री रविशंकर विद्या मंदिराचे मुख्याध्यापक दिगंबर कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात ध्यानधारणा या विषयाचे महत्त्व सांगुन मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्येक व्यक्तीला जीवनामध्ये जसे शरीरासाठी योग, प्राणायाम आवश्यक आहे तसेच मनाच्या आरोग्यासाठी ध्यानधारणा तेवढीच महत्त्वाची आहे . यामुळे अनेक रोगापासून व्यक्तीला निरोगी ठेवण्यास मदत होते. शारीरिक, मानसिक, बौद्धिक या सर्व गुणांचा विकास ध्यान धारणेमुळे वृद्धिंगत करता येतो. आर्ट ऑफ लिविंग च्या माध्यमातून याचे जागतिक स्तरावर प्रचार व प्रसार करण्यात येत यासाठी शाळा महाविद्यालयात या ध्यानधारणा वरती मार्गदर्शन करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले. हिरानाथ सगर सरांनी आर्ट ऑफ लिव्हिंग चे प्रमुख श्री श्री रविशंकर यांचे ध्यान धारणेचे प्रात्यक्षिक कॅडेटस, विद्यार्थ्याकडुन करून घेतले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पदमाकर पिटले, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. चंद्रसेन करे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ गिरीधर सोमवंशी व कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास डॉ. उदय मोरे यांनी सहकार्य केले कार्यक्रमास प्राध्यापक, कॅडेटस, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

# बंकटराव कदम स्मरणार्थ पार्वती प्रशालेत वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२१ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील माजी सरपंच, पार्वती कन्या प्रशालेचे संस्थापक बंकटराव कदम यांच्या स्मरणार्थ शाळेत श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या स्मरणार्थ दोन वडांच्या झाडांची लागवड करण्यात आली.

पार्वती कन्या प्रशालेत शिक्षक पालक संघ व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा सचिव महेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. बैठकीम ध्ये पार्वती कन्या प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष, माजी सरपंच, संस्थापक संचालक, तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखाना नळदुर्ग, कुलस्वामिनी सहकारी सूत गिरणी तुळजापूरचे संस्थापक संचालक कै. बंकटराव कदम यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मरणार्थ प्रशालेच्या तीने ०२ वडांच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या सचिव तथा मुख्याध्यापिका लता सोमवंशी-कदम म्हणाल्या की, घर घर संविधान, विद्यार्थी सुरक्षिततेबाबत चर्चा तसेच केंद्र शासनाकडून नवीन नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढण्यात आले. अपार आयडीचे ८०% काम पूर्ण, प्रशालेमध्ये वॉटर प्युरिफायर बसविण्यात येणार, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत व गुणवत्तेबाबत, पाचवी नवोदय परीक्षेबाबत व पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा बाबत चर्चा तसेच इ.१० वी सराव परीक्षा १ व २, तसेच २१ फेब्रुवारीपासून दहावी बोर्ड परीक्षेला सुरुवात होणार आहे, अशी माहिती सांगितली.

कार्यक्रमासाठी उपाध्यक्ष बसवराज कवठे कोषाध्यक्ष ब्रह्मानंद कदम तसेच गावातील डॉ. संजय कदम, सचिन कदम, कलाल, प्रशालेचे शिक्षक विजय मोरे, बसवराज मडोळे, अभिमन्यू कदम, सुजाता होटकर, पंढरीनाथ कदम, रोहिणी तळेकर, सचिन गुड, विशाल कदम, लाळे व प्रशालेतील विद्यार्थी उपस्थित होते.

# तेरखेडा आठवडी बाजारात मोबाईल चोरट्यांचा धुमाकूळ

## भाजप तालुकाध्यक्षांचा मोबाईल केला लंपास...

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२१ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा आठवडी बाजारात मोबाईल चोरट्यांनी मोठा धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे नागरिकात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दर शनिवारी तेरखेडा गावात मोठा आठवडी बाजार भरतो. वाशी तालुक्यातील नव्हे तर भूम, कळंब, परंडा तसेच सोलापूर जिल्ह्यातील व्यापारी, नागरिक भाजीपाला खरेदी विक्रीसाठी येत आहेत. त्यामुळे बाजाराचे स्वरूप मोठे असते. याच गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोर बाजारात भाजीपाला घेण्यासाठी आलेल्या नागरिकांच्या म ोबाईलवर डल्ला मारतात.

मागील अनेक दिवसांपासून तेरखेडा आठवडी बाजारात असे प्रकार सुरू असून मोबाईल चोरांच्या सराईत टोळीने धुमाकूळ घालत आहेत. एक आठवडा जातोयका नाही तोपर्यंत शनिवार दि.२१ रोजी बाजारात चोरट्यांनी मोबाईल लंपास केला आहे.

गेल्या एक आठवड्यात तेरखेडा बाजारात चोरट्यांनी माजी सरपंचाचा म ोबाईल लंपास केला होता. तर आता कालच्या शनिवारी भाजप तालुकाध्यक्ष कामानिमित्ताने बाजारातून गावात जात असताना चोरट्यांनी त्यांच्या मोबाईलवर डल्ला मारला. नागरिक, व्यापारी, ग्राहक यांच्या गैरसोयीत वाढ झाली आहे. तरी सदरील मोबाईल चोरांच्या हरकतीस पोलिसांनी वेळीस आळा घालून जेरबंद करावे अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

# पवनचक्की प्रकरणात लोकप्रतिनिधींचा आवाज उठवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ डिसेंबर -**

शेतकऱ्यांना दमदाटी करणाऱ्या पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यावर प्रशासन कारवाई का करत नाही? उलट अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनाच प्रशासन थातुरमातुर उत्तरे देऊन त्यांना समजविण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसुन येत आहे. याप्रकरणी आता लोकप्रतिनिधीनी आवाज उठवुन शेतकऱ्यांच्या म ुळावर उठलेल्या या धनदांडग्या कंपन्यावर कारवाई व्हावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

तुळजापुर तालुक्यात आज पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यांनी अक्षरशा धुमाकुळ घातला आहे. अनेक ठिकाणी सर्व नियम धाब्यावर बसवत पवनचक्क्या उभारल्या जात आहेत. अनेक गरीब शेतकरी या पवनचक्क्या उभारणाऱ्या कंपन्याम ुळे आत्मदहन करण्याच्या तयारीत आहेत. होर्टी ता. तुळजापुर येथील शेतकरी नामदेव घोडके यांनी या पवनचक्की उभारणाऱ्या कंपनीच्या मनमानी कारभाराला कंटाळुन आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. यावरून तालुक्यातील शेतकऱ्यांवर किती अन्याय होत आहे याची कल्पना येते. अशाच घटना अनेक ठिकाणी घडत आहेत हे योग्य नसुन यामुळे शेतकरी देशोधडीला लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यांची काळजी घेण्यापेक्षा शेतकऱ्यांची काळजी घेऊन त्यांना धीर देणे गरजेचे आहे.

जवळगा मेसाई येथे एका कंपनीकडुन पवनचक्की उभारली जात आहे याठिकाणी शेतकऱ्यांच्या द्राक्ष बागेतुन शेतकऱ्यांच्या समंतीशिवाय पवनचक्की उभारण्याचे साहित्य वाहुन नेण्यासाठी रस्ता केला जात आहे. एकप्रकारे हा प्रकार मनम ानीचाच आहे. त्याचबरोबर काळ्या रंगाच्या गाड्यांमधुन बाऊंन्सरआणुन शेतकऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या कंपन्या करत आहेत. या कंपन्यांना कांही स्थानिक दलालांचे याकामी सहकार्य मिळत आहे. त्याचबरोबर या कंपन्यांनी कांही गुंडप्रवृत्तीचे लोकही पाळुन ठेवले आहेत. अशा कंपनीच्या दलाल आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकांमुळेही शेतकरी त्रासुन गेला आहे.याला वेळीच प्रशासनाने आवर घालणे गरजेचे आहे.अन्यथा याचा स्फोट व्हायला वेळ लागणार नाही. त्यावेळी या कंपन्यांना पळताभुई थोडी होईल. आज पोलिस प्रशासन प्रत्येकवेळी पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यांचीच बाजु घेत असल्याचे अनेक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. नळदुर्ग पोलिस ठाण्यातील एक अधिकारी केवळ याच कामावर नेमले आहे की काय असा संशय येत आहे. कारण प्रत्येक ठिकाणी हाच अधिकारी शेतकरी आणि पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यामधील वाद मिटवायला हजर असतात याचा अर्थ काय समजायचा. आज तालुक्यातील शेतकरी टिकला पाहिजे, शेतकऱ्यांच्या शेतजमिनी जाग्यावर राहिल्या पाहिजेत यासाठी आता सर्वांकडुन प्रयत्न होणे गरजेचे आहे अन्यथा तुळजापुर तालुका हा या पवनचक्क्यामुळे शेतीमुक्त तालुका होण्यास वेळ लागणार नाही. त्याचबरोबर प्रशासनही पवनचक्की असेल किंवा सौरऊर्जा प्रकल्प असेल हे प्रकल्प उभारण्यासाठी शासकीय जमीनी मोठ्याप्रमाणात देऊन टाकत आहे. आज नळदुर्ग येथील जवळपास २० एकर जमीन सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी देण्यात आली आहे. अशप्रकारे जमि नींचे वाटप होत असेलतर भविष्यात शासकीय जमीनच शिल्लक राहणार नाही याचाही विचार प्रशासनाने करणे गरजेचे आहे.

पवनचक्क्या उभारणाऱ्या सर्व कंपन्या या धनदांडग्यांच्या आहेत. या कंपन्या आज आहेत उद्या नाहीत त्यामुळे आपल्या तालुक्यातील शेतकरी वाचला पाहिजे, आपल्या शेतजमिनी शिल्लक राहिल्या पाहिजेत यासाठी आता सामुहिक उठाव होणे गरजेचे आहे. यासाठी लोकप्रतिनिधीनी यामध्ये लक्ष घालुन शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे.

CMYK


धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## स्वामी विवेकानंद शाळेत संस्कृती ज्ञान परीक्षा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ डिसेंबर -**

उमरगा दि.२१ डिसेंबर रोजी शहरातील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरात विद्याभारती संस्कृती शिक्षा संस्था देवगिरी प्रांत द्वारा आयोजित सांस्कृतिक ज्ञान परीक्षेत इयत्ता ४ थी ते ७ वीच्या वर्गातील एकूण ५० विद्यार्थ्यांनी संस्कृती ज्ञान परीक्षा दिली.



आपल्या विद्यार्थ्यांमध्ये भारताची महान अध्यात्मिक संस्कृती, थोर परंपरा, जीवनमूल्ये, महापुरुषांचे आदर्श जीवन चरित्र, आपल्या पूर्वजांनी दिलेले ज्ञान-विज्ञान हा आपला अमोल ठेवा विद्यार्थ्यांच्या बालमनावर प्रतिबिंबित व्हावा. यासाठी दरवर्षी या परीक्षेचे आयोजन विद्याभारती मार्फत केले जाते.

संस्कृती ज्ञान परीक्षा शाळेत आयोजित करण्यासाठी आमच्या संस्थेचे कार्यवाह डॉ. कपिलजी महाजन यांच्याकडून प्रेरणा घेऊन शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार यांच्या मार्गदर्शनाखाली बेबीसरोजा पवार व गोविंद जमादार यांनी परीक्षा यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.



## संक्षिप्त वृत्त...



### जयप्रकाश विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रशस्ती प्रमाणपत्र देऊन सत्कार

**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे बालविवाह निर्मूलनासाठी घेण्यात आलेल्या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचे प्रशस्ती प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यालयाच्या प्रांगणात महिला व बाल विकास विभाग, जिल्हा प्रशासन शिक्षण विभाग, युनिसेफ व सेंटर फॉर सोशल अँड बिहेवियर चेंज कम्युनिकेशन, मुंबई यांचा संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या सक्षम बालविवाह निर्मूलन प्रकल्प अंतर्गत बालविवाह निर्मूलनाकरिता विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धेत यश प्राप्त केल्याबद्दल इ. नववी मधील माने आनंदी, कानवले सायली, नलावडे तनुजा, जाधव अनुष्का, तर इ. आठवीतील गुंड श्रद्धा, कस्पटे अनुष्का, गव्हाणे ईश्वरी, निर्मले समीक्षा यांचा प्रशस्ती प्रमाणपत्र व पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे, माजी ग्रा.प. सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, पर्यवेक्षक डोंगरे के.ए., शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार सचिन कांबळे यांनी मानले.

### विद्यार्थी कल्याण मंडळाच्या समन्वयकपदी डॉ.संदीप देशमुख

**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात विद्यार्थी कल्याण मंडळाच्या जिल्हा समन्वयकपदी डॉ.



संदीप बाळासाहेब देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची नुकतीच बैठक घेऊन ही निवड करण्यात आली. विद्यार्थी कल्याण मंडळाच्यावतीने केंद्रीय युवक महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी धाराशिव जिल्हयातून डॉ. संदीप देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. देशमुख हे रामकृष्ण परमहंस महाविद्यालय सहायक प्राध्यापकपदी कार्यरत आहेत. या नियुक्ती बद्दल माजी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख, डॉ. अंकुश कदम, डॉ. वैलास अंभुरे, डॉ. सुयोग अमृतकर यांनी अभिनंदन केले आहे.



### कृषी विभागाकडून श्रमदानातून संजितपूर येथे केला वनराई बंधारा

**येरमाळा, दि.२१ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील संजीतपूर येथे कृषी विभागा मार्फत श्रमदानातून वसंत मुकदम बाराते यांच्या शेताजवळ तेरणा नदीकाठी वनराई बंधारा तयार करण्यात आला. यावेळी तालुका कृषी अधिकारी सरडे, मंडळ कृषी अधिकारी ओव्हाळ तसेच कृषी पर्यवेक्षक चौधरी, कृषी सहाय्यक बी.डी. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तेरणा नदीवर वनराई बंधारा श्रमदानातून तयार करून शेतकऱ्यांना वनराई बंधारे विषयी तसेच पाणी व्यवस्थापन विषय सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संजीतपूर येथील प्रगतशील शेतकरी विष्णू बाराते, समाधान बाराते, वसंत बाराते, चंद्रकांत राऊत, मधुकर बाराते, प्रवीण पुणेकर, विश्वास बाराते आधी शेतकरी उपस्थित होते.

### सोमनाथ क्षिरसागर यांचे निधन

**तुळजापूर, दि.२१ डिसेंबर -**



येथील विशाल प्रिंटिंग प्रेसचे मालक सोमनाथ काशिनाथ क्षीरसागर यांचे (वय ६९) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर तुळजापूर खुर्द येथील स्मशानभूमीत दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी सर्व क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन विवाहित मुली व भावंडे आहेत.

### सुहासनी शेटे यांचे निधन

**तुळजापूर, दि.२१ डिसेंबर -**



येथील सुहासिनी शशिभाल शेटे (वय ८६) यांचे शनिवार सकाळी ६:३० वाजता वृध्दापकाळाने निधन झाले. आंत्यविधी दुपारी घाटशीळ येथील स्मशानभूमी करण्यात आले. त्यांच्या पक्षात पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंडे आहेत. विधीज्ञ गिरीश शेटे यांच्या त्या वहिनी होत.

## श्री तुळजाभवानी मंदिरासमोर भक्तीमय वातावरण शिवीगाळीमुळे गढूळ...

# बांगड्या विकणाऱ्या महिलांचा मंदिर महाद्वारासमोर धिंगाणा

**▸▸ अर्वाच्य भाषा वापरून अतिक्रमण धारकाचा राडा** **▸▸ नगर परिषद कर्मचाऱ्यांना शिवीगाळ !** **▸▸ कडक कारवाईची व्यापाऱ्यांसह भाविकांची मागणी**

**तभा वृत्तसेवा /सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२१ डिसेंबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह इतर राज्यातून मोठ्या श्रद्धेने भक्ती भावाने भाविक दर्शनासाठी येतो. पण दर्शनासाठी आल्यानंतर मंदिर महाद्वारासमोर काटीवाले, दोऱ्यावाले, छोटे-मोठे फेरीवाले, गाड्यावाले, आणि बांगड्या विकणाऱ्या महिला यांचे नेहमीच आपापसात भांडणं तंडे एकमेकाला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून भक्तीमय वातावरण दूषित करण्याचे काम मोठ्या प्रमाणात चालू आहे. देवाच्या दरबारात आपापसात शिव्याशाप देऊन अतिक्रमण धारक व्यापारी भक्तिमय वातावरण गढूळ करत आहेत. भाविकांना नको ते शब्द कानावर पडतात. येणारे भाविक कुटुंबासह लहान मुलांसह वृद्ध आई-वडिलांसह दर्शनासाठी आलेले असतात त्यावेळी त्यांना या सर्वांचे भांडण तंटे पाहून नको ते शब्द ऐकावे लागत आहेत.

दैनिक तरुण भारतच्या २० डिसेंबर रोजी आलेल्या शहरात मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिक्रमण बातमीमुळे संपूर्ण शहरसह तालुक्यात खळबळ माजली होती. प्रशासन खडाडून जागे झाले आणि

**दै. 'तरुण भारत'च्या बातमीची दखल घेत अतिक्रमण धारकांवर कारवाई**

दि.२१ डिसेंबर रोजी नगरपालिकेचे एक पथक अतिक्रमण हटवण्यासाठी मंदिर महाद्वारासमोर गेले असता बांगड्या विकणाऱ्या महिलांनी नगरपरिषद कर्मचाऱ्यास शिवीगाळ करून नंतर आपापसात भांडणे चालू केली. अतिक्रमण हटवण्यासाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांसमोर एकमेकाला भांडणे चालू केल्याने नगरपरिषद कर्मचारी अतिक्रमण हटवण्याऐवजी यांचे भांडणं सोडवायचे काम करू लागले. तर यातील काही महिला कर्मचाऱ्यांच्या अंगावर जाऊन कर्मचाऱ्याला देखील मारहाण करण्यापर्यंत या अतिक्रमण करणाऱ्या महिलांची मजल गेल्याचे दिसून आले. पोलीस प्रशासन सदरील घटनेची गांभीर्याने दखल घेणार का नाही, असा प्रश्न शहरवासीयांना पडला आहे. बघ्यांची गर्दी आणि भाविकांची गर्दी मोठ्या संख्येने असताना देखील मंदिरासमोर जवळ जवळ अर्धा तास हा राडा चालू होता. अतिक्रमण धारकावर कारवाई करण्यासाठी गेले असता हे अतिक्रमण धारक भांडण करतात. अतिक्रमण काढले असता पुन्हा अतिक्रमण करतात. भाविकांना त्रास होऊ नये असे रोडच्या बाजूस देखील बसत नाहीत. पोलीस प्रशासन, मंदिर, व्यापारी सर्वांनी मिळून अतिक्रमण हटवण्यासाठी सहकार्य करायला हवे. ग्राऊंड लेवलला काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना होणारा त्रास अधिकारी यांना माहित नसतो. २४ तास यांच्यावर पाळत ठेवणे शक्य नाही. नगरपरिषदसह पोलीस प्रशासनाने अतिक्रमणधारकांवर कडक कारवाई करणे गरजेचे आहे, असे मत नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक दत्तात्रय साळुंके यांनी मांडले आहे.



## आरोपींना कठोर शिक्षा होईपर्यंत आम्ही देशमुख कुटुंबियासोबत : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

मस्सा (जो) (जि.बीड) येथील सरपंच संतोष देशमुख यांची दि.९ डिसेंबर रोजी निर्घुण हत्या करण्यात आली. याचे पडसाद महाराष्ट्राच्या विधानमंडळासह सर्वत्र पडले. खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी संसदेचे अधिवेशन संपताच मस्सा (जो.) येथे जावून मयत सरपंच देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेवून सांत्वन केले.

खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना महाराष्ट्र सरकारने या प्रकरणात नेमलेल्या एसआयटीला निपक्षपातीपणे तपास पुर्ण करणेबाबत निर्देश देण्याची विनंती केली आहे. आज कुटुंबियांची भेट घेतल्यानंतर महाराष्ट्र सरकारने चौकशी करुन निर्घुणपणे एखाद्याचे जिवन व कुटुंबास उध्दवस्त करणाऱ्या वृत्तीला कायद्याव्दारे कठोर शिक्षा करावी व भविष्यात अशा प्रकारेचे कृत्ये करण्याची कोणाची हिम्मत होणार नाही. अशा कठोर उपाययोजना करुन त्याची आंमलबजावणी करावी, अशी मागणी केली आहे.

## येडशी परिसरात वाघाची दहशत; दोन गाई जखमी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यात पहिल्यांदाच वाघाचे दर्शन झाले असून, येडशी परिसरात त्याचा मुक्त संचार असल्याचे समोर आले आहे. गेल्या दोन महिन्यांपासून बिबट्याच्या दहशतीने त्रस्त असलेल्या जिल्ह्यात आता वाघाच्या भीतीने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

या वाघाने दोन गाईंवर हल्ला करून त्यांना जखमी केले आहे. वन विभागाने लावलेल्या ट्रॅप कॅमेऱ्यात हा वाघ कैद झाला असून, वन विभागाकडून त्याचा फोटोही प्रसारित करण्यात आला आहे.

धाराशिव जिल्ह्यात बिबटेही तुरळक प्रमाणात आढळत होते, मात्र आता वाघाचे आगमन झाल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. या वाघाला पकडण्यासाठी वन विभाग सतर्क झाला असून, त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत आहे. वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाघाला जेरबंद करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. धाराशिव जिल्ह्यातील भूम, परंडा, वाशी तालुक्यात तसेच येडशी भागात बिबट्याचा संचार वाढल्याने शेतकरी भयभीत झाले आहेत. आतापर्यंत दोन बिबटे आणि एक वाघ आढळून आला असून, वन विभागाला तो अद्याप सापडलेला नाही. या प्राण्यांमुळे आतापर्यंत चार जनावरे मृत्युमुखी पडली असून, दोन माणसांवर हल्ला झाला आहे.

वन विभागाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन बिबटे आणि वाघाला लवकरात लवकर जेरबंद करावे, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

## जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे ६२ वर्षीय महिलेचा मृत्यू

**२० तास जिल्हा रुग्णालयात ठेवले प्रेत... डॉक्टरवर कारवाई करण्याची नातेवाईकांची मागणी...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

तालुक्यातील शिंगोली येथील शांताबाई दत्तू गवळी या रुग्णास जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टर व परिचारिका यांनी वेळेवर औषध उपचार न केल्यामुळे त्यांना आपला जीव गमविण्याची दुर्दैवी घटना दि.२१ डिसेंबर ऊघडली आहे. दरम्यान, संबंधित डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर जोपर्यंत कारवाई केली जाणार नाही. तोपर्यंत ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा नातेवाईकांनी घेत ते प्रेत तब्बल २० तास रुग्णालयातच ठेवले.

दरम्यान, दुसऱ्या दिवशी दि.२१ डिसेंबर रोजी पोलीस अधिकारी व रुग्णालयातील डॉक्टर यांनी रुग्णालयात येऊन नातेवाईकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे ते नातेवाईकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन चक्क निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांच्या केबिनमधील फरशीवरच ठिय्या मांडला. जोपर्यंत संबंधितावर कारवाई करणार असल्याचे लेखी आश्वासन देत नाहीत. तोपर्यंत आम्ही येथून जाणार नसल्याचा पवित्रा घेतला. त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिनिधींनी शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेत चौकशी अहवाल आल्यानंतर संबंधितावर कारवाई केली जाईल असे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर नातेवाईकांनी तेथून काढता पाय घेत प्रेत ताब्यात घेतले. त्यामुळे शासकीय जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचा निष्काळजी व दुर्लक्षितपणा पुन्हा चव्हाट्यावर आला असून सर्वसामान्य रुग्णांच्या जीवाशी खेळ करून शासकीय नोकरीवर असणारे डॉक्टर स्वतःच्या खाजगी दवाखान्यात थांबवून रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांची कशी पिळवणूक करतात? हे समोर आले आहे. विशेष म्हणजे नातेवाईकांनी हा कत्तलखाना आहे का दवाखाना ? हे संबंधित डॉक्टरांनी जाहीर करावे असे खुले आव्हान देत विविध प्रश्न विचारले आहेत.

मात्र जिल्हाधिकाऱ्यांशी शिष्टमंडळ भेटल्यानंतर त्यांनी चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्यानंतर ते प्रेत गावाकडे नेऊन त्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी जिल्हा सचिव शांतिनाथ शेरखाने, शहराध्यक्ष शहाजी शेरखाने, राज्य कार्यकारणी सदस्य धोंडीराम वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष संपत शेरखाने, जिल्हा संघटक साहेबराव शेरखाने, तालुका उपाध्यक्ष दादासाहेब गवळी आदींसह चर्मकार समाज बांधव उपस्थित होते.

## लालबहादूर शास्त्री विद्यालयात संविधान व अंधश्रद्धा जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

खेड येथील लालबहादूर शास्त्री उच्च व माध्यमिक विद्यालयात भारतीय संविधान अमृतमहोत्सवी वर्ष व अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या ३५ व्या वर्षानिमित्त संविधान व अंधश्रद्धा जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. गेल्या काही दिवसांपासून खेड किणी विमानतळ रस्त्यालगत परिसरात भानामती करणी सारखा प्रकार आढळुन आल्याने येथील नागरिक भयभीत झाले होते.

अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या टिमने पोलिस प्रशासन सह तिथे भेट देऊन नागरिकांना अंधश्रद्धेचा प्रकार आहे असे सांगितले व त्याला स्मरुनच अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या वतीने आज रोजी खेड येथील लालबहादूर शास्त्री उच्च व माध्यमिक विद्यालयात अंधश्रद्धा जादुटोणा विरोधी चमत्कार व विज्ञान हा कार्यक्रम घेऊन अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे जिल्हाध्यक्ष ॲड. अजय वाघाळे प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांना अंधश्रद्धा निर्मुलन चमत्कारा मागील विज्ञान व जादुटोणा प्रतिबंधक कायदा सांगण्याचा प्रयत्न केला.

तर तस्लीम काझी यांनी केलेल्या प्रात्यक्षिक प्रयोगाचे विश्लेषण सांगितले.

भारतीय संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मतदार जनजागरण समितीच्या वतीने भारतीय संविधान जनजागृती करण्यात येत असुन कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधान उद्देशिका व विश्लेषण पत्रक वाचुन करण्यात आली. आलेल्या मान्यवरांचे स्वागत शाळेतील शिक्षकांनी पुष्प बुके देऊन केले.

यावेळी अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे जिल्हाध्यक्ष ॲड. अजय वाघाळे, बुबासाहेब जाधव, अब्दुल लतिफ, सिध्देश्वर बेलुरे, गणेश वाघमारे, बलभीम कांबळे, तस्लीम काझी, रोहिदास भिसे, शेख आर.ए., शिंदे शाळेतील शिक्षक वर्ग विद्यार्थी अन्य इतर उपस्थित होते.

## संघटित गुन्हेगारी खपवून घेतली जाणार नाही : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

राज्यातील अन्य जिल्ह्यांप्रमाणे आपल्या धाराशिव जिल्ह्यातील काही तालुक्यात संघटित गुन्हेगारीचे प्रकार घडत असल्याचे समोर येत आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक एकत्र येऊन सामान्य नागरिकांना त्रास देत असल्याच्या तक्रारी येत आहेत. अशाप्रकारे सामान्य नागरिकांना जर कोणी जाणून बुजून त्रास देण्याचा प्रयत्न करत असेल तर असे प्रकार अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील याबाबत कठोर भूमिका घेतली आहे. त्यामुळे अन्याय सहन न करता संबंधितांनी याबाबत पुराव्यांसह पोलिस अधिक्षकांडे तक्रार द्यावी. आपण स्वतः व्यक्तीशी या बाबींची गांभीर्याने दखल घेऊ, अशा संघटित गुन्हेगारांना कायदेशीर अद्दल घडवू असे प्रतिपादन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

सध्या जिल्ह्यात अनेक भागात पवनचक्की व सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याची कामे सुरू आहेत.

याअनुषंगाने संघटित गुन्हेगारी क्षेत्रातील लोक दुष्प्रवृत्ती सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. सामान्य नागरिकांना वेठीला धरून त्यांना त्रास देणे, दबाव टाकणे अशा स्वरूपाची कृत्ये समोर आली आहेत. विविध स्तरातून याबाबत ऐकीव माहिती आपल्यापर्यंत पोहचली आहे.

याअनुषंगाने जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना अशा प्रकरणात कायदेशीर कारवाई करण्याच्या सक्त सूचना दिल्या आहेत.

जिल्ह्यातील शेतकरी असो की सामान्य नागरिक त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आपले महायुती सरकार पूर्णतः कटिबद्ध आहे. त्यामुळे अशा प्रकारे कोणाला जाणीवपूर्वक कोणी त्रास देत असेल तर त्यांनी रीतसर आवश्यक त्या पुराव्यासह पोलिसांकडे तक्रार द्यावी व त्याची पोच घ्यावी. आपण स्वतः योग्य ती दखल घेऊन पोलिसांच्या माध्यमातून त्याला पायबंद घालण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले आहे.



बीड जिल्ह्यातील मस्साजोग प्रकरणी विधानसभेत उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील याबाबत कठोर पावले उचलणार असून संघटित गुन्हेगारी संपवण्यासाठी मोक्कासारखा कायदा वापरला जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

त्यामुळे आपल्या धाराशिव जिल्ह्यात देखील संघटित गुन्हेगारीचे प्रकार घडत असतील तर नागरिकांनी याबाबत पुढे येऊन तक्रार द्यावी.

बीड प्रमाणेच इथे देखील अशा गुन्हेगारांना पायबंद घालण्यासाठी मोक्का कायद्याचा वापर करण्यात येणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले आहे.

# लोहा मतदारसंघात इंजेक्शन व गोळ्या घेतलेला पहेलवान चालणार नाही : आ. चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २१ डिसेंबर**

लोहा विधानसभा मतदार संघात इंजेक्शन व गोळ्या घेतलेला पहेलवान चालत नाही.दंड व मांड्या थोपटणारे मल्ल कुठे दिसले नाहीत.कोणाला कोणता पेच घालावा लागती .हे गेल्या तीस चाळीस वर्षात आम्हाला कळले आहे राजकीय आखाड्यात मेहनती व कसरत करणारा पहेलवान कुस्ती जिंकत असतो, जनतेनी नेहमीच मदतीला धावून जाणाऱ्या व काम करणाऱ्यां माझ्या सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यास साथ दिली आहे आपल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही.व विकासासाठी निधी कमी पडणार नाही असा विश्वास नवनिर्वाचित आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला.

आष्टूर (ता. लोहा) येथे प्रभु दतात्रय यांच्या यात्रे निमित आयोजित भव्य कुस्त्यांची दंगल पार पडली त्या उद्घाटन प्रसंगी आ० प्रतापराव पाटील चिखलीकर बोलत होते. यावेळी युवा नेते प्रविण पाटील चिखलीकर, माजी पं.स. सभापती आनंदराव पाटील ढाकणीकर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार ,सचिन पाटील चिखलीकर, स्वप्नील पाटील लुंगारे ,माजी जि.प. सदस्य चंद्रमुनी मस्के, डॉ. बाळासाहेब शिंदे, परमेश्वर मुरकुटे, संयोजक बाळू पाटील बाबर, माऊली पाटील बाबर, माजी सरपंच मधुकर बाबर, अनिल बाबर, दता बाबर, सरपंच हणमंत धुळगंडे (माळेगाव यात्रा) संतोष राठोड, राजू राठोड यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदा्धिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.



आ० प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की,काहीं पहेलवान दंड-मांड्या थोपटत होते पण प्रत्यक्षात निवडणूक रिंगणात उतरलेच नाहीत कोणाला कोणता पेच घालावा लागतो कोणता 'डाव' टाकावा लागतो याचे सगळे' पेच ' आम्हाला ठावूक आहेत. काही पहेंलवान पैसाचे इंजेक्शन व गोळ्या घेवून मैदानात उतरले पण लोहा विधानसभेच्या आखाड्यात अनेक वर्षापासून' तयार झालेले' व ' नावाजलेले 'मल्ल 'आहेत. सगळ्या सोबत आमची कुस्ती झाली आहे. डाव - कोणता टाकावा व पेच केव्हा टाकावा लागतो.हे सगळं महित आहे तुम्ही सगळेजण ओळखून आहात काही जण ऐनवेळीच पहेलवानकी दाखवत होते पण जनतेनी अशा' पहेलवानाला घरचा - गावचा रस्ता दाखविला आहे. माझ्या सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांवर जे प्रेम केलात - सहकार्य केलात हा मतदार संघातील जनतेचा विश्वास ढळू देणार नाही असे प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी ग्रामस्थांना अश्वसित केले व आरंभी त्यांनी आष्टुर येथील जागृत देवस्थान महादेव मंदिरात जाऊन अभिषेक केला. प्रभू दत्तात्रयाचे दर्शन घेतले .गावकऱ्यांनी त्याची शर्करा तुला केली गावात मिरववुक काढण्यात आली.गावातील अनेकांनी सत्कार केला.आमदार टर्म -३ कार्यकाळात सत्कार व कार्यक्रम घेण्याचा पहिला मान आष्टुर या गावाला मिळाला.

## संक्षिप्त वृत्त

### खतगांव येथे व्हॉलीबॉलचे एकदिवसीय खुले सामने

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम खतगांव येथे व्हॉलीबॉलचे एकदिवसीय खुले सामने दि.२२ डिसेंबर,२०२४ रोजी रविवारी आयोजित करण्यात आले आहेत. सदरील सामन्यांचे उद्घाटन सकाळी ९ वाजता गाव परिसरातील मान्यवरांकडून यथोचित करण्यात येणार आहे.उद्घाटक म्हणून माजी मुख्यमंत्री मा.श्री.एकनाथ शिंदे साहेबांचे खाजगी सचिव तथा माजी सनदी अधिकारी श्री.बालाजी पाटील खतगांवकर, साई शिक्षण मंडळ,सचिव श्री.बाळासाहेब पाटील खतगांवकर,कुउबास बिलोलीचे सभापती,श्री.रवी पाटील खतगांवकर तर प्रमुख पाहुणे माजी जि.प.सदस्या, सौ.मिनलताई पाटील खतगांवकर, गोविंदराव पाटील,व्यंकटराव खतगांवकर, अमृतराव पाटील, मल्लेश पेटेकर,शंकरराव पाटील आदि मान्यवर आवर्जून उपस्थित राहणार आहेत. या सामन्यात भरघोस बक्षिसांची लयलूट संघ खेळाडूंना करता येणार आहे.अनुक्रमे प्रथम,द्वितीय,तृतीय, चतुर्थ ११,१११ रू., ७,००१रू., ५,००१रू.,३,००१रू. अशा रक्कम बक्षीसरूपी स्वरूपात कै.मधुकररावजी पाटील खतगांवकर, कै.नामदेवराव पाटील खतगांवकर,कै.हरि पाटील वर्णे,कै.तुळसाबाई पेटेकर आदींच्या स्मरणार्थ हे पुरस्कार संबंधित नातलगांच्या वतीने मान्यवरांकडून विजेत्या संघास प्रदान करण्यात येणार आहेत. सामन्यातील उत्तेजनार्थ बक्षीस ३,००१ रू. प्रताप अंकुशकर, बिलोली यांच्यावतीने दिले जाणार आहे. वैयक्तिक पारितोषिकांमध्ये बेस्ट शुटर,बेस्ट सेटर,बेस्ट लिब्रो,बेस्ट ऑलराऊंडर प्रत्येकी स्पर्धक खेळाडूस १,००१रू.प्रमाणे जाहीर करण्यात आले आहेत. सदरील सामन्यांचा खतगांव व तालुका,जिल्हा परिसरातील व्हॉलीबॉल संघांनी,खेळाडू प्रेमी प्रेक्षकांनी, नागरिकांनी,मुलांनी लाभ घ्यावा,असे आयोजक गजानन व्हॉलीबॉल संघ व समस्त गावकऱ्यांनी आवाहन केले आहे.

### चंदर मरीबा चौदंते यांचे निधन



**मुदखेड**-भीमनगर येथील रहिवाशी का. चंदर मरीबा चौदंते यांचे दि. २१ डिसेंबर रोजी सकाळी ४:०० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७० वर्ष होते. त्यांचा अंत्यविधी दुपारी २:३० वाजता भिमनगर येथील बौद्ध स्मशान भुमी येथे करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा,एक मुलगी, नातवंड, असा परिवार आहे.राजू चंदर चौदंते यांचे ते वडिल होत.

# भगवान काळेंना लोकसंवाद पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ डिसेंबर**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, करकाळा यांच्या वतीने दिला जाणारा लोकसंवाद सद्भावना पुरस्कार भगवान काळे यांना जाहीर झाला आहे, असे संयोजक दिगंबर कदम यांनी पत्राद्वारे कळविले आहे. गोरगरिबांच्या, शेतकऱ्यांच्या, मजुरांच्या मदतीला नेहमी धाऊन येणारे सामाजिक कार्यकर्ते म्हणजे भगवान काळे होत. ते एक दानशूर व्यक्तिमत्त्व आहेत. दि. ३ जानेवारी २०२५ रोजी भोकर येथील एक दिवसीय लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनात हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान होणार आहे. उद्घाटक खा. रवींद्र चव्हाण, आ. हेमंत पाटील, आ. रामराव पाटील, संमेलनाध्यक्ष प्रा. महेश मोरे यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान होणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, रोख रक्कम, प्रशस्तिपत्र, महावस्त्र, गौरव पदक, ग्रंथभेट असे आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल भगवान काळे यांचे सर्वदूर अभिनंदन होत आहे.



# मुदखेड येथे राष्ट्रसंत गाडगे महाराज यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २१ डिसेंबर**

स्वतःच्या कृतीतून स्वच्छतेचा संदेश देणारे,अशिक्षित असूनही वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे व त्याचा प्रचार-प्रसार करणारे,दिवसा गावातील घाण साफ करणारे आणि संध्याकाळी भजन व किर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या मनातील उच्च-निचतेची,अंधश्रद्धेची,असमानतेची घाण साफ करणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या ६८ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतीस



राष्ट्रसंत गाडगे महाराज चौक नांदेड रोड मुदखेड येथे अभिवादन करण्यात आले.

राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी माजी सैनिक महालिंगआप्पा घोंगडे,भाजपा शहराध्यक्ष संजय सोनटक्के, ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष संजय चव्हाण, संतोष पाटील गाढे, माजी नगरसेवक किशोर पारवेकर, सचिन पाटील मगरे, राम आबादार, सचिन टेकले, युवा मोर्चा शहर सरचिटणीस संतोष सावंत, देवानंद वाघमारे माधव टमाटेवाले, गजानन सावंत, विनोद वाघमारे, बालाजी गऊळकर, यासह आदींची उपस्थिती होती.

# महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सोशल मीडिया जिल्हा संयोजकाचा केला सन्मान

## भाजपा मंत्र्यांकडून नागेश शिंदे यांचे विशेष कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. २१ डिसेंबर**

विधानसभा २०२४ निवडणूक काळात नांदेड जिल्ह्या सह सर्व महाराष्ट्रातील विधानसभे मध्ये सोशल मीडियाच्या पदाधिकाऱ्यांनी जे समर्पण भावनेने केलेले कष्ट व अथक परिश्रमा बदल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी सोशल मीडिया जिल्हा संयोजकांची दि १९ डिसेंबर रोजी उझ क्लब, नागपूर येथे विशेष बैठक घेऊन सोशल मीडियाच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले यावेळी सोशल मीडिया जिल्हा संयोजक नांदेड उत्तर चे नागेश शिंदे यांचा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी विशेष सत्कार करून त्यांचे कौतुक केले.



याबाबत सविस्तर वृत्त असे की लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडी कडून फेक निगेटिव्ह पसरवून मतदारांची दिशाभूल करत जो फटका महायुतीला बसला होता याचे सूक्ष्म निरीक्षण करून मागील झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी सोशल मीडिया व आयटी सेलने संपूर्ण महाराष्ट्रभर विधानसभा वाईज उनिवा लक्ष्यात घेऊन वेळोवेळी प्रदेश कार्यालयाकडून आलेल्या सूचनांचे पालन केल्यामुळे महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वात नेत्र दीपक यश मिळाले त्याबद्दल नागपूर येथे होत असलेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिनांक १९ डिसेंबर रोजी महाराष्ट्रातील सोशल मीडिया व आयटी सेलच्या जिल्हा संयोजकाची एक बैठक सीपी क्लब नागपूर येथे आयोजित केली होती त्या बैठकीच्या आयोजक सोशल मीडिया महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रकाशजी गाडे यांनी केले होते त्या बैठकीत मराठवाडा संयोजक साईनाथ शिरपुरे, व नांदेड जिल्हा संयोजक नागेश शिंदे, अक्षय आमीकंठवार, नांदेड महानगर संयोजक उमेश सरोदे यांनी उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांचे कौतुक करून त्यांचा सन्मान केला त्यानंतर लगेच महाराष्ट्रामधील सर्व नवनिर्वाचित मंत्री व आमदारा सोबत स्नेह भोजन करून नवनिर्वाचित मंत्र्यांनि सोशल मीडियाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# श्री संत रंगनाथ महाराज स्मरणार्थ अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद,दि. २१ डिसेंबर**

हभप.वै.धोंडोपंत दादासाहेब व हभप.वै. गुंडामहाराज चांदेगावकर यांच्या कृपा आशिर्वादाने व वेदांत केसरी न.भु. श्री संत रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या ५५ व्या पुण्य स्मरणार्थ दि.२१-२८ डिसेंबर या दरम्यान विठ्ठल मंदिर मुक्रमाबाद येथे श्री भगवन्नाम संकीर्तन महोत्सव सुरू आहे.



अखंड हरीनाम सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रमाची रुपरेषा पुढील प्रमाणे असून पहाटे ०४ ते ०६ काकडा, सकाळी १० ते ०१ गाथाभजन, सायं.०४ ते ०५ प्रवचन, सायं. ०६ ते ०७ हरिपाठ, रात्री ०९ ते ११ हरिकिर्तन सेवा, १२ ते पहाटे ०४ हरिजागर होईल. किर्तन सेवेत अनुक्रमे दि.२१ डिसेंबर रोजी रात्री श्री.ह.भ.प. व्यंकट महाराज माने, ह.भ.प. अवधूत महाराज एकबेकर, ह.भ.प. पांडुरंग महाराज कोकाटे, वसुदेव महाराज कोलंबीकर, संदीपपान महाराज हासेगावकर, भगवान महाराज महाळंगीकर, पद्माकर महाराज देशमुख अमरावती, दि.२८ रोजी हभप. गंगाधर महाराज पाटील चेंडेगावकर यांचे काल्याचे किर्तन होईल. दि.२६ रोजी संत रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या पुण्यतिथी निमित्त दुपारी हभप. निवृत्ती महाराज रावीकर यांचे गुलालाचे किर्तन होईल. अनंत सावकार पंदीलवार यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहतील किर्तन सेवेला गाथा प्रमुख दिगंबर पांचाळ,पुजारी अंतू महाराज,मृदंगाचाराची साथ पांडुरंग काळे व चंद्रकांत पांचाळ यांची असणार आहे. तर गायनाची साथ व्यंकट महाराज एकलारा,माधव पांचाळ ,अशोक महाराज मंडलापूरकर,ऋषिकेश पाटील बेळीकर यांची साथ लाभणार आहे. तरी या हरिकीर्तन सेवेचा लाभ जास्तीच्या संख्येने भाविकांनी घ्यावी असे आव्हान संजय पंदीलवार व प्रकाश पंदिलवार यांनी केले आहे.

# गृहमंत्री अमित शाहांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेदार्थ मुक मोर्चा



**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद,दि. २१ डिसेंबर**

संसदेच्या सभागृहात विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी आक्षेपार्ह वक्तव्य करून अवमानित केल्याबद्दल देशातील समाज बांधवांच्या भावना दुखावल्यामुळे जाहीर निषेध नोंदवून शुक्रवारी मुक्रमाबाद मुख्य बसस्थानक येथे सामाजिक कार्यकर्ते मष्णाजी बाजगीरे यांनी शांततेच्या मार्गाने मुक आंदोलन सुरु केले आहे. यावेळी परिसरातील समस्त आंबेडकरी समर्थकांनी सदर घटनेचा जाहीर निषेध करून तीव्र संताप व्यक्त केला आहे. यावेळी आरपीआयचे माणिक गायकवाड, शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर, शिवसेनेचे उपतालुका प्रमुख मन्मथ खंकरे, रज्जाक कुरेशी, दादाराव गुमडे, अशोक लोणीकर, जलील पठाण, सैलानी शेख, यांनी आंदोलनास पाठिंबा दिला आहे. सपोनि भालचंद्र तिडके व पोउपनि.अमर केंद्रे यांनी कडक पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# गोदावरी अर्बनने शेतकऱ्यांना दिले आर्थिक साक्षरतेचे धडे



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ डिसेंबर**

गोदावरी अर्बन ही संस्था कायमच समाजातील सर्व घटकांसाठी विविध उपक्रम घेत असते. या सामाजिक जाणिवेतून संस्थेने गोदावरी किसान आर्थिक साक्षरता अभियाना च्या माध्यमातून कळंब व मानोरा येथील शेतकऱ्यांना आर्थिक साक्षरतेचे धडे दिले. हा सामाजिक उपक्रम संस्थेचे संस्थापक मा.बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष नामदार हेमंत पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अध्यक्ष राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर,तंत्रज्ञान मार्गदर्शक तथा बीपीआर प्रकल्पाच्या प्रमुख सुमालता राव यांच्या नियोजनाखाली राबविण्यात आला.

# डॉ. अभिषेक सौदे यांना अटल गौरव भूषण पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड दि.२१ डिसेंबर**

भारतीय जनता पार्टीचे माजी गटनेते व माजी नगरसेवक डॉ. अभिषेक सौदे यांना अटल फाऊंडेशनचा देण्यात येणार २०२४ चा अटल गौरव सन्मान पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे.

देशसेवेच्या निरंतर कार्यात आपले महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्याचे सुपुत्र तथा भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते डॉ. अभिषेक रमेशराव सौदे यांना २०२४ या वर्षाचा अटल गौरव (सन्मान) अवॉर्ड (पुरस्कार) अलंकारिक केलेले प्रशासकीय पत्र मेडल व सन्मान पत्र नवी दिल्ली येथील प्रधानमंत्री संग्रहालय तीन मूर्ती, नवी दिल्ली येथे



आज सन्मान करून गौरविण्यात आले. याप्रसंगी अटल फाऊंडेशन राष्ट्रीयच्या अध्यक्षा सौ.अपर्णा सिंह त्रिपाठी, माजी केंद्रीय मंत्री सत्यनारायण जातीया , भाजपाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्याम जाजु , जयपूर खासदार मंजुषा शर्मा जी, जयपूर महापौर सौम्या गुज्जर व अटल फाऊंडेशन महाराष्ट्र प्रदेशाचे अध्यक्ष गणेश जी राजे, अटल फाऊंडेशन महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गोविंद शिंदे, अटल फाऊंडेशन नांदेड जिल्हाध्यक्ष गजानन टोकलवाड यावेळी उपस्थित होते. सौदे यांना मिळाललेल्या या सन्मान बद्दल सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

# पोउपनि सचिन रघुपतीचे प्रशिक्षण पूर्ण ; पहिली पोस्टिंग अमरावती

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २१ डिसेंबर**

बिलोली तालुक्यातील मौजे केसराळी, येथील भूमिपुत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झालेले चि.सचिन दाऊजी रघुपती,केसराळीकर यांनी नाशिक पोलीस प्रशिक्षण अकादमीतून वर्षभरातील रितसर खडतर प्रशिक्षण पूर्ण केले आहे.दि.२१ डिसेंबर रोजी नाशिक अकादमीत सदरील पोलीस उपनिरीक्षक बॅचेसचा 'पासिंग आऊट परेड कार्यक्रम' भव्यदिव्य संपन्न झाला आहे.

सचिनचे सुरूवातीस शिक्षण पहिली ते सहावी जि.प.कन्या शाळा, कुंडलवाडी,सातवी जि.प.वरिष्ठ प्राथमिक शाळा,केसराळी,आठवी ते दहावी श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल,सगरोळी,पॉलिटेक्निक अर्थात अभियांत्रिकी अभ्यासक्रम पदवी शासकीय तंत्रनिकेतन कॉलेज,नांदेड तर बी.ई.मेकॅनिकल अर्थात 'अभियांत्रिकी



अभियंता पदवी' रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय,नागपूर येथून शिक्षण पूर्ण केले आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर चि.सचिन रघुपती यांची पहिली नेमणूक अमरावती पोलीस विभागात झाली आहे.अथक आणि नियमित अभ्यासाने सचिनने हे यश पादाक्रांत केले आहे.आदमपूर,केसराळी,सगरोळी गाव परिसर, मार्गदर्शक, आजी माजी ग्रामपंचायत पदाधिकारी, सहशिक्षक,मित्रांनी चि.सचिन यांच्या पुढील धडाडीच्या कार्यासाठी शुभेच्छां देत अभिनंदन केले आहे. नांदेड जि.प. सेवानिवृत्त सहशिक्षक श्री.दाऊजी रघुपती यांचे हे कनिष्ठ चिरंजीव आहेत.

# जनावरांची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. २१ डिसेंबर**

बिलोली तालुक्यातील कार्ला फाटा येथे दि.२० डिसेंबर रोजी रात्रीला २ वाजन्याच्या सुमारास एका काळ्या रंगाच्या महिंद्रा वाहनात गोवंश जनावरांची चोरी करून नेत असल्याची गोपीनिय माहितीनुसार पोलिसांनी सापळा रचून सहा जनावारासह चार नंबर प्लेट असलेली अवैध वाहन पकडून ताब्यात घेतली. बालाजी गंगाधर मिरदोडे यांच्या फिर्यादीनुसार सैफ पटेल, झिया कुरेशी व त्यांच्या इतर साथीदारवर महाराष्ट्र पशु संरक्षण कायद्या अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अबिनाश कुमार पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैध धंदयावर कार्यवाही तसेच महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये कारवाई करण्याबाबत सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने दि २० डिसेंबर रोजी रात्री २ वाजन्याच्या सुमारास बिलोली पोलीस हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना कार्ला फाटा येथे एक काळया रंगाची महिंद्रा कंपणीची चारचाकी



गाडी थांबलेली दिसली असता पोलिस वाहन जवळ जात असतांना सदर गाडी पोलीसांना पाहुण बिलोली शहराकडे निघुन गेली त्यावेळी बिलोली पोलीसांनी तात्काळ सदर गाडीचा पाठलाग करून सदर गाडी थांबवली असता त्यात सहा गोवंश जातीची जनावरे त्याची किंमत १ लाख १२ हजार असल्याची मिळून आली सदर जनावरे व वाहन असे एकुण किंमती ४ लाख १२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर तस्करा विरूद्ध महाराष्ट्र पशु संरक्षण कायद्या अन्वये गु.र.क्र. ३४६/२०२४ कलम ३०३(२), ३(५), भा.न्या.सं-२०२३ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिकारी अबिनाश कुमार, पोलीस अधिक्षक नांदेड (IPS), खंडेराव धरणे अपर पोलीस अधिक्षक भोकर, सुरज गुरव अपर पोलीस अधिक्षक नांदेड, रफिक शेख उपविभागीय पोलीस अधिकारी बिलोली यांनी हा गुन्हा उघडकिस आणला आहे. बिलोली ठाण्याचे सपोनि अतुल भोसले, पोहेकॉ मारोती मुददेमवार, सुनिल दस्तके, पोकॉ घोंगडे यांच्या कामगिरी बद्दल वरिष्ठाकडून अभिनंदन केले जात आहे.

गेल्या अनेक दिवसापासून बिलोली तालुक्यात ग्रामीण व शहरी भागातून जनावरांची चोरी झाल्याच्या घटना घडल्या आहेत पण याबाबत अजूनही छडा लागलेला दिसत नाही. विशेषतः ही जनावरांची तस्करी महाराष्ट्र व तेलंगणाच्या विविध मार्गाने होत आहे अनेकदा वाहाना द्वारे गोवंश जनावरांना नेत असताना विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्या आहेत.

# संत गाडगे महाराज यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर ,दि. २१ डिसेंबर**

स्वच्छतेचे संदेश देणारे अधश्रद्धा आणि अस्वच्छता बद्दल जागृती करणारे त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला.असे थोर राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी हिमायतनगर शहरातील परमेश्वर मंदिर सभागृहात दिनांक २० डिसेंबर रोजी सायंकाळी सात वाजता राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळी मान्यवराच्या हस्ते गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिनंदन करण्यात आले.

यावेळी आकलवाड सर, राम नरवाडे, विलास वानखेडे, गजानन हारडपकर, विकास नरवडे, विपुल दंडेवाड, अनिल मादसवार, मनोज पाटील, अनिल भैरे, अनिल सूर्यवंशी, फुलके आदि सह परमेश्वर भजनी मंडळी उपस्थित होती.

# धनंजय मुंडेला मंत्रीमंडळातून काढा; मागणी करताच अजित पवारांनी पळ काढला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

मस्साजोग येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मयत संतोष देशमुख यांच्या कुटूंबियांचे सात्वनपर भेट घेतली. या प्रसंगी ग्रामस्थांमध्ये मोठा असंतोष दिसत होता. संतोष देशमुख यांचे मारेकरी अजून मोकाटच आहेत. या संदर्भात आमचे म्हणणे अजित पवारांनी ऐकूण घ्यावे अशी भावना ग्रामस्थांची होती.भेट देऊन अजित पवार गाडीकडे जात असतांना ग्रामस्थांनी आपला रोष व्यक्त केला. त्यांनी धनंजय मुंडे यांची मंत्रीमंडळातून हकाटपट्टी करावी अशी मागणी करताच अजित पवार यांनी पळ काढला. समयचुकतेने अजित पवार यांनी गाडीकडे जाण्याचा निर्णय घेतला अन्यथा ग्रामस्थांच्या रोषाला अजित पवार यांना सामोरे जावे लागले असते. याच बरोबर महिलांचाही मोठा आक्रोश होता. या दरम्यान महिला भगिणी यांनीही बोलण्यासाठी वेळ मागितला मात्र त्यांना काही प्रतिसाद न दिल्याने त्यांनीही घोषणाबाजी केली. सर्वांची एकच घोषणाबाजी होती, आरोपीला तात्काळ अटक करा, धनंजय मुंडेंची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले देशमुख परिवाराचे सांत्वन
## दोषी व्यक्तींना कठोर शासन होईल याची दिली ग्वाही




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खुन्यांना कठोर शिक्षा होईल या दृष्टिकोनातून शासन काम करीत आहे याप्रकरणी दोषी व्यक्तींना फाशी दिली जाईल यासाठी मी स्वतः या प्रकरणात पूर्ण लक्ष देणार आहे अशी ग्वाही देतो असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मस्साजोग येथे देशमुख यांच्या कुटुंबीयांच्या सांत्वन प्रसंगी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मस्साजोग येथे भेट दिली. दिवंगत देशमुख यांची पत्नी, मुलगी तसेच भाऊ धनंजय देशमुख यांच्याशी त्यांनी घटनेबाबत चर्चा करून माहिती घेतली व शासन सर्व प्रकारे या प्रकरणात तपास करून देशमुख कुटुंबाला न्याय मिळवून देईल असे सांगितले.

## वाल्मिक कराड स्वतःहून पोलिसात हजर होणार!



खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा पोलिसात हजर होणार असल्याच्या चर्चेला उधान आले आहे. जिल्ह्यातील अनेक कानाकोपऱ्यात वाल्मिक कराड हा स्वतःहून पोलिसात हजर होणार असल्याची चर्चा ऐकावयास मिळते.

## बीडच्या पोलीस अधीक्षकपदी नवनीत कॉवत



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

संतोष देशमुख हत्याप्रकरणात तपासात कुचराई केल्याच्या ठपका ठेवत बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची तडकाफडकी बदली करण्यात आली होती. यानंतर बीडमध्ये आज नव्या एसपींची नियुक्ती करण्यात आली आहे.

नवनीत कावत हे बीडचे नवीन पोलीस अधीक्षक राहणार असून, ते यापूर्वी पोलीस उपायुक्त छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी कार्यरत होते. आता बीड मधील कायदा सुव्यवस्था सुरळीत करण्याचे आवाहन कावत यांच्यासमोर असणार आहे.

# केद्र आणि राज्य सरकारने मस्साजोग येथील घटनेच्या बुडाशी जाऊन तपास करावा-खा.शरद पवार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

खा.शरद पवार हे शनिवारी दि.२१ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या दरम्यान मस्साजोग येथे मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची व गावकऱ्यांची भेट घेऊन त्यांचे सोबत संवाद साधला.यावेळी खा.निलेश लंके, खा.बजरंग सोनवणे, आ.संदिप क्षीरसागर,माजी आ.उषाताई दराडे, पृथ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख यांच्यासह अनेकांची यावेळी उपस्थिती होती.

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच यांचे ९ डिंसेबर सोमवारी आपहरण करुन खून करुन त्यांचे प्रेत फेकून या गुन्ह्यातील आरोपी फरार झाले होते.पोलीसांनी तपास चक्रे फिरवून या घटनेतील महेश केदार, जयराम चाटे, प्रतिक घुले आणि विष्णू चाटे यांना अटक करुन केज न्यायालयात हजर केले असता तीन आरोपींना २३ डिंसेबर पर्यत तर चौथा आरोपी विष्णू चाटेला २७ डिंसेबर पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे हे तीन आरोपी अद्यापही पोलिसांना हुलकावणी देत फिरत आहेत. त्यांच्या शोधासाठी चार पथके राज्याच्या विविध भागांत पाठविण्यात आलेली आहेत.मस्साजोग येथे शनिवारी अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवला होता.शनिवारी मस्साजोग येथे मोठ्या प्रमाणात महीला आणि नारगीक व तरुण यवक मोठ्या संख्येंने जमले होते.



# जिजाऊ मल्टीस्टेट एमपीआयडी प्रस्तावास तातडीने मान्यता द्यावी

**लाचखोर पीआय हरिभाऊ खाडेला बडतर्फ करा-मारुती तिपाले, शेख कुतुब**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीची पाळेमुळे खणताना अर्थिक गुन्हेगारी क्षेत्राकडे सुध्दा गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.जिल्ह्यातील हजारो ठेवीदारांना लुबाडणाऱ्या व्हाईट कॉलर अर्थिक गुंडाना कडक शिक्षा देवून धडा शिकवला पाहिजे. ठेवीदारांना न्याय देण्या ऐवजी कोट्यावधीचा गंडा घालणाऱ्या आरोपींना मदत करणारे आर्थिक गुन्हे शाखेचे तपास अधिकारी लाचखोर पीआय हरिभाऊ खाडे यांना सेवेतून बडतर्फ करावे अशी मागणी जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट अन्यायग्रस्त ठेवीदारांच्या वतीने मारुती तिपाले व शेख कुतुब यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यात जिजाऊ माँसाहेब , ज्ञानराधा, साईराम ,राजस्थानी, मराठवाडा अर्बन यांच्यासह अनेक मल्टीस्टेट बँकांनी सामान्य जनतेचे करोडो रुपये लुटले. अन्यायग्रस्त ठेवीदार हतबल असुन त्यांचे संसार आर्थिक संकटात आले. जिल्ह्यतील आर्थिक गुन्हेगारी बाबत तत्कालीन पालकमंत्री यांनी उदासीनता दाखवली.आंदोलन,पाठपूरावा करून ही शासनाने दुर्लक्ष केले. परिस्थितीचा फायदा घेऊन पोलीस अधिकाऱ्यांनी चांगलेच हात धुवून घेतले.कर्तव्याचे भान न ठेवता ठेवीदारांना वाऱ्यावर सोडून आरोपींना मदत व फायदा होईल असाच तपास केला गेला. अनेक आरोपी फरार आहेत, तर ज्यांना पकडले त्यांची थातूरमातूर चौकशी करून कागदं काळे केले. आरोपींचा बीपी वाढेल अशी सबब पुढे करून जाणीवपूर्वक आरोपी कडून ठोस माहिती काढली नाही.पोलीस आणि आरोपी यांच्यामध्ये आर्थिक व्यवहार घडल्याने तपास कुचकामी ठरला. ठेवीदारांनी गुन्हा नोंद करून पावणे दोन वर्ष होत आहेत. अजूनही तपास पूर्णत्वाकडे नाही, एमपी आयडी १९९९ अंतर्गत प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे आहे.ठेवीदारांना त्यांच्या घामाचा पैसा परत मिळणार की नाही याबद्दल साशंकता आहे. शासन दरबारी न्याय मिळवण्या साठी ठेवीदार धडपडत आहेत. न्याय विलंबना साठी पोलीस प्रशासन जबाबदार आहे. जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेव घोटाळा प्रकणाचे तपास अधिकारी पीआय हरिभाऊ खाडे यांनी तपास काम करताना लाच घेतली. लाच लुचपत प्रतिबंधक विभागात त्यांचे विरोधात गुन्हा नोंक्र. ०१०७/ १६/५/२०२४ रोजी गुन्हा रोजी नोंद केला गेला. खाडेवर पोलीस कस्टडी व न्यायालयीन कोठडीची कारवाई करण्यात आली. परंतु मुदतपूर्व चार्जशीट न्यायालयात दाखल करण्याची परवानगी वरिष्ठांनी नाकारली. यामुळे त्यांना जामीन मिळाला. रंगे हात पाच लाख रुपयांची लाच स्वीकारताना सक्षम अधिकारी पकडला. परंतु चार्जशीट दाखल करू दिले नाही. अंतिम क्षणापर्यंत ठेवीदार बांधवांनी पोलीस महासंचालकां पर्यंत चार्जशीट दाखल करण्याची विनंती केली. परंतु अद्याप चार्जशीट दाखल झाले नाही. लाचखोर लोकसेवका बाबत एवढी सदभावना कशामुळे...? कारण खाडे यांना मदत करणारा राजकीय हात त्यांच्या पाठीशी असल्याने त्यांचेवर कडक कारवाई झाली नाही. तपासाअंती उत्पन्नापेक्षा जास्त संपत्ती आढळल्याने दि. २१/११/२०२४ रोजी खाडे यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागात दुसरा गुन्हा नोंद झाला. खाडे यांच्या विरोधात दोन गंभीर गुन्हे असून ही खाडेवर कठोर कारवाई सोडाच ते आज मोकाट आहेत. आणि जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट प्रकरणाचा कुचकामी तपास धुळखात पडला. तपास अधिकारी खाडे यांना निलंबित करून जिजाऊ माँसाहेब, मल्टीस्टेट घोटाळ्यात सह आरोपी करून नव्याने तपास करून अद्यावत चार्जशीट न्यायालयात दाखल करावे अशी मागणी यापूर्वी अनेकदा गृह मंत्रालयापासून सर्व वरिष्ठांकडे केली आहे.देवेंद्रभाऊ सरकारने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन लाचखोर पीआय खाडे यांना तातडीने सेवेतून बडतर्फ करावे.जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट एमपीआयडी १९९९ अंतर्गत प्रस्ताव मान्यतेसाठी ११ जुलै २०२४ पासून गृह विभागाकडे आहे. हा प्रस्ताव अपूर्ण असून यामध्ये सर्व आरोपींच्या मालमत्ता समाविष्ट करून प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. व ठेवीदारांना पैसे परत देण्यासाठी ठोस कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी जिजाऊ माँसाहेब ठेवीदार डॉ.अरविंद काकडे,इंजि. सखाराम कळासे, लक्ष्मण हाटवटे, चंद्रकला ताई बांगर, विशाखा सूर्यवंशी, भाऊसाहेब परसे, सूर्यभान नवले, आदींनी केली आहे.

## स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ द्या-माजी आमदार लक्ष्मण पवार

# गेवराई शहरातील महा आरोग्य शिबीरात उत्स्फूर्त प्रतिसाद

### हृदयविकाराकडे दूर्लक्ष करू नका, काळजी घ्या-डॉ. सुनिल बोबडे यांचे हृदय रोगावर अमूल्य मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२१ डिसेंबर**

रोजच्या धावपळीत आयुष्याकडे दूर्लक्ष झाल आहे. त्यामुळे, आजाराचा आलेख उंचावत चालला आहे. काळजी करण्याची गरज असून, नागरीकांनी निरोगी आरोग्यासाठी स्वतःची काळजी घेतलीच पाहिजे. हृदय विकाराच्या वाढत्या घटना काळजीत टाकणाऱ्या असून, वेळीच लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन हृदय रोग तज्ज्ञ डॉ. सुनिल बोबडे यांनी येथे बोलताना केले आहे. शनिवार ता. २१ डिसेंबर रोजी युवा नेते बाळराजे पवार यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराई शहरातील नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजीमहाराज शॉपिंग सेंटर सभागृहात महा आरोग्य शिबीराचे आयोजित करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.



व्यासपीठावर माजी आमदार लक्ष्मण पवार, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरज कोठावळे, डॉक्टर राजेश शिंदे, डॉक्टर सराफ, शिवराज पवार, नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, डॉ.धनजय माने, डॉ.दिपक फाटक,डॉ.आनंद मोटे,डॉ. विशाल पवार, डॉ.प्रशांत गायकवाड यांची उपस्थिती होती. दरम्यान, दैनंदिन जीवनात भाजीपाला आणि हलक्या आहाराचा उपयोग करून, तळलेले, तेलकट आणि मेदयुक्त पदार्थ टाळायचा प्रयत्न करा, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले आहे. दरम्यान, वय वाढल्यावर आपल्या आरोग्याची काळजी नागरिकांनी घ्यायलाच हवी. व्याधी सुरू झाल्यानंतर, पश्चाताप करण्यात काय अर्थ आहे. अपरिहार्यता म्हणून, आपल्याला रासायनिक युक्त अन्नधान्य खावे लागते. त्यामुळे, प्रत्येक नागरिकांनी स्वतःसाठी एक दोन गुंठ्ठे किंवा परसबागेत पालेभाज्या लावून, आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी केले. पवार यांनी स्व- अनुभव विशद करून, हृदय विकाराचा त्रास होऊ नये, या संदर्भात काय काळजी घ्यावी, या विषयी महत्त्वपूर्ण गोष्टी सांगून, आरोग्यमय धनसंपदा असल्याचा उल्लेख केला. ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांनी ही हृदय विकाराचा सामना कसा केला. या विषयी मार्गदर्शन करून, स्व अनुभव विशद केला. यावेळी डॉ. सुनिल बोबडे यांनी हृदयविकाराची लक्षणे आणि उपाय या विषयी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, टॅक म्हणजे, हृदयावर हामला. रक्त पुरवठा कमी झाला की, टॅक येण्याचा धोका वाढतो. ताणतणाव, चिडचिड होणे, अती राग ,अवेळी खानपान, तेलकट, मेदयुक्त पदार्थाचे सेवन, उशिरा झोप इ. कारणाने हृदय विकाराचा संभव असतो. अलीकडच्या काळात ६३% लोकांना हृदय रोगाचा त्रास सहन करावा लागतो. मात्र, केवळ ५३% लोक तत्परता दाखवत नाहीत, ही गंभीर बाब असून, सरकारी, खाजगी रुग्णालयात उपचार घेऊन, रूग्ण बरा होतो. याकडे त्यांनी लक्ष वेधले.हृदय विकारात प्रचंड वेदना होतात. ९०% छातीत दुखते,१०% लोकांना पाठित, डाव्या हातात त्रास जाणवतो. मात्र, आपल्याला जळजळ झाल्याने त्रास होत असेल, या दृष्टिकोनातून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. हे अतिशय चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. हृदय रोग, मधुमेह टाळता येतो. अनुवंशिक आजाराचा इतिहास असेल तर, किमान असे आजार कंट्रोल ठेवता येतात, असे निरिक्षण डॉ. बोबडे यांनी नोंदवून, अचानक त्रास जाणवला की, घाबरू नका ; कुणाची तरी मदत घ्या. शांत पडून रहा, चालू नका, गडबड करू नका, असा मौलिक सल्ला ही त्यांनी दिला. वेळेत वैद्यकीय तपासण्या करा, आपल्याकडे सुविधा उपलब्ध आहेत. त्याचा फायदा घ्या, असे आवाहन करून, बीड शहरात आपल्या हक्काचा मेडिकेअर नावाचा दवाखाना रुग्ण सेवेसाठी सदैव तत्पर असणार आहे. गेल्या दीड - दोन वर्षांपासून बांधिलकी जोपासून आम्ही करत आहोत. शासन स्तरावर असलेली सुविधा उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे, गेवराईकरांनी हक्काने यावे, असे कृतज्ञतापूर्वक आवाहन डॉक्टर बोबडे यांनी शेवटी बोलताना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक संजय इंगळे यांनी केले. आभार ड. भगवान घुंबार्डे यांनी मानले.बाळराजे पवार मित्र मंडळाच्या वतीने पार पडलेल्या महा शिबीरात मधुमेह , रक्तदाब, हृदयरोग, ई.सि.जी. करण्यात आली. या शिबीरात नागरिकांनी रक्तदान करून सहभाग नोंदवून शिबीराचा लाभ घेतला. सदरील शिबीर यशस्वी करण्यासाठी राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुबार्डे, राहुल खंडागळे, दादासाहेब गिरी, ब्रम्हदेव धुरंधरे, याहीया खॉन, राम पवार, संजय इगळे, मुन्नासेठ,कृष्णा काकडे,राजाभाऊ आर्दड, धम्मपाल सौदरमल, भरत गायकवाड, सय्यद बद्दोदिन,छगन आप्पा हादगुले, किशोर धोडलकर, अरुण मस्के, जानमहमंद बागवान, आप्पासाहेब कानगुडे, जुनेद बागवान, इम्रान पठाण,सय्यद हासन, यांनी प्रयत्न केले.

## बाळराजे पवारांच्या वाढदिवसानिमित्त सौ.गिताभाभीच्या हास्ते शालेय साहित्यांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२१ डिसेंबर**

गेवराई मतदार संघाचे माजी आमदार आदरणीय श्री लक्ष्मण आण्णा पवार यांचे मोठे बंधू भाग्यविधाते आदरणीय दैवत श्री बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ताकडगाव येथे सामाजिक उपक्रम, अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताकडगाव येथे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले ह्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती, गेवराई तालुक्याच्या रणरागिणी आमचे दैवत आदरणीय सौ, गिता भाभी पवार ह्यांच्या हस्ते शालीय साहीत्य वाटप करण्यात आले, यावेळी प्रमुख उपस्थिती भाजपा महिला आघाडीच्या तालुका अध्यक्ष आदरणीय सौ.रत्नमाला,नानी मोटे, यावेळी उपस्थित गावातील महिला सौ,अनिता केदार, श्रीमती,सत्यशिला गिरी श्रीमती, सावित्रा मोटे, श्रीमती निलावती पालेकर, यावेळी शाळेचे विद्यार्थी शिक्षक, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री शिवाजी सानप, श्री काशिद सर,श्री प्रदीप सराफ सर, श्री भगवान कोळी सर श्रीमंती,कल्पना,जाधव.मॅडम, श्रीमती रेणुका शेळके मॅडम, शाळेचे शिक्षक इत्यादी उपस्थित गावातील नागरिक, या कार्यक्रमाचे,आयोजन श्री शिवाजी पवार,माजी ग्रामपंचायत सदस्य श्री मनोज, केदार ,अविनाश मोटे, भाजपा दिव्यांग विकास आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष श्री दत्ता गिरी , श्री कल्याण मोटे,श्री लक्ष्मीकांत पालेकर, ,श्री नामदेव मोटे केले,, होते, यावेळी उपस्थित माजी सरपंच विजय डोळस,जालीदंर केदार,ग्रामपंचायत सदस्य, श्री अनंत मोटे, ग्रामपंचायत सदस्य,श्री आप्पा मोटे श्री,कैलास मोटे,, गावातील जेष्ठ नागरिक श्री आत्माराम राऊत, श्री शंकर मोटे,श्री कारभारी काकडे व ईतर ताकडगावातील,गावातील नागरिक या सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रल्हाद शिंदे सर यांनी केले व आभार प्रदर्शन, प्रदीप सराफ सर यांनी केले उपस्थित होते,